सत्यमेव जयते

# नागरिकांची सनद

२०२३



पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन

# नागरिकांची सनद–२०२३
# (Citizen's Charter-2023)

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

## पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग

**नवीन प्रशासन भवन, १५ वा मजला,**
**हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,**
**मंत्रालय, मुंबई–४०० ०३२.**

## महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

**२रा, ३रा व ४था मजला, कल्पतरु पॉईंट बिल्डिंग,**
**शिव (पूर्व), मुंबई–४०० ०२२.**

**********

**महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन व शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील कलम ८(१) मधील तरतुदीनुसार**

**नागरिकांची सनद**
**(सिटीझन चार्टर)**

जनतेची कामे अधिक कार्यक्षमतेने व उत्तम प्रकारे पार पाडून शासनाच्या दैनंदिन कामात पारदर्शकता आणणे या शासनाच्या धोरणास अनुसरून पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाने नागरिकांची सनद या उपक्रमाद्वारे पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या योजना व त्यांची अंमलबजावणी बाबतची माहिती त्याचप्रमाणे, विभागाच्या अधिपत्याखालील महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत पर्यावरणाचा समतोल व प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण याबाबत केल्या जाणाऱ्या उपाययोजनांची माहिती जनतेसमोर मांडण्याचा संकल्प केला आहे.

पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाची सनद या पूर्वीच गठीत समितीची मान्यता घेऊन सन-२००० साली प्रसिद्ध करण्यात आली आहे. सामान्य प्रशासन विभागाच्या दि. ०६.०९.२०११ च्या परिपत्रकानुसार नागरिकांची सनद प्रसिद्ध करून बराच कालावधी होऊन गेल्याने नागरिकांच्या सनदेत नव्याने काही योजना, शासन निर्णय व राज्य शासनाने पारित केलेले नियम / अधिनियम, इत्यादी सारांश स्वरुपात समाविष्ट करण्यात आले आहेत. विभागातील अधिकारी वर्गाची नांवे, पदनाम व दूरध्वनी क्रमांक तसेच माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या अंमलबजावणीकरिता सहायक माहिती अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचा तपशील त्याचप्रमाणे पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या वेबसाईटचाही नागरिकांच्या सनदेत समाविष्ट करण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्य हे भारतातील औद्योगिक दृष्टीने पुढारलेले राज्य असून, राज्यातील बहुतेक नागरी वस्ती बृहन्मुंबई प्राधिकरण व दहा-अ वर्ग शहरामध्ये एकवटली आहे. वाढत्या कारखान्यांमुळे व शहरीकरणामुळे पर्यावरणाचा ऱ्हास होत असून परिणामी प्रदूषणामुळे मानवी जिवितास हानिकारक असलेले म्हणजे पटकी, विषमज्वर, कावीळ, दमा, श्वसनाचे रोग, मानसिक रोग, इत्यादी आजारांना नागरिकांना तोंड द्यावे लागत आहे. एवढेच नव्हे तर प्रदूषणामुळे शहरातील जलचर, वनचर, पशुपक्षी व वनस्पती यांनाही हानी पोहचत आहे. याकरिता पर्यावरणाचा समतोल राखून प्रदूषण प्रतिबंध करून नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाची व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची आहे.

*********************

## **१. पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग (खुद्द), मंत्रालय**

## **1. Environment and Climate Change Department, Mantralaya.**

**प्रास्ताविक:**

मंत्रालय पातळीवर नगर विकास विभागातून स्वतंत्र पर्यावरण विभाग वेगळा करून दिनांक ०१/०५/१९८५ पासून अस्तित्वात आला आहे. पर्यावरण विभागाचे नामकरण "**पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग** " असे करण्यात आले असून, त्याबाबत दिनांक ०६ ऑगस्ट, २०२० ची अधिसूचना सामान्य प्रशासन विभागाकडून प्रसिध्द करण्यात आली आहे.

प्रधान सचिव (पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग ) यांना त्यांच्या प्रशासकीय कामात एक सहसचिव, एक उप सचिव, एक अवर सचिव व एक कक्ष अधिकारी मदत करतात. विभागातील तांत्रिक कामात प्रधान सचिव (पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग) यांना मदत करण्यासाठी संचालक (पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग ), शास्त्रज्ञ श्रेणी-१ व शास्त्रज्ञ श्रेणी-२ हे अधिकारी आहेत.

विभागाचे काम सर्वसाधारण पर्यावरण संरक्षण हे आहे. यापैकी जल प्रदूषण व हवा प्रदूषणाचे नियंत्रण, तसेच अन्य पर्यावरणविषयक अधिनियमांची अमंलबजावणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळा मार्फत करण्यात येते. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या दैनंदिन कामकाजावर मंडळाचे अध्यक्ष, सदस्य सचिव आणि इतर मंडळाचे सदस्य यांचे नियंत्रण असून मंडळ पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या अखत्यारीत काम करते.

### **पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग**

**१.** महाराष्ट्र राज्य हे भारतातील एक औद्योगिक दृष्टीने पुढारलेले राज्य असून या राज्यात मोठ्या प्रमाणावर लहान मध्यम व मोठे उद्योग आहेत. महाराष्ट्रातील शहरी भागात ४५ टक्के लोकवस्ती एकवटली असून त्यापैकी ७० टक्के नागरी वस्ती बृहन्मुंबई प्राधिकरण व एकूण १० एवढ्या अ वर्ग शहरात एकवटली आहे. वाढत्या कारखान्यांमुळे आणि शहरीकरणांमुळे मुंबई प्राधिकरण भागात लोकसंख्या वाढत आहे. यामुळे पर्यावरणाचा वेगाने ऱ्हास होत आहे.

### **२. सी आर झेड प्राधिकरण -**

केंद्र सरकारने पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ च्या अंतर्गत सागरतटीय विनियमन अधिसूचना (CRZ Notification) १९ फेब्रुवारी, १९९१ रोजी पारीत केली होती. आता सदर अधिसूचना रद्द करुन केंद्र शासनाने नव्याने पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ अंतर्गत क्र. S. O. १९(E) दिनांक ६ जानेवारी, २०११ अन्वये नवीन सीआरझेड अधिसूचना पारित केली आहे. या अधिसूचनेनुसार प्रत्येक राज्याने सागर तटीय व्यवस्थापन आराखडा (Coastal Zone Management Plan) तयार करुन त्यास केंद्र सरकारची मंजूरी घेणे आवश्यक आहे. केंद्र सरकारने कोस्टल रेग्युलेशन झोनच्या अधिसूचनांची योग्य तऱ्हेने अमंलबजावणी करण्यासाठी प्रधान सचिव/सचिव (पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग ) यांच्या अध्यक्षतेखाली बारा जणांचे एक प्राधिकरण नियुक्त केले आहे. पर्यावरण व वातावरणीय बदल विभागातील उपसचिव किंवा उपसचिव पदाच्या समकक्ष पदावरील अधिकारी हे या प्राधिकरणाचे सदस्य सचिव आहेत. कोस्टल झोन अधिनियमांच्या सूचनांचा भंग झाल्यास या प्राधिकरणामार्फत संबंधितांवर कारवाई करण्यात येते.

राज्यातील सीआरझेड क्षेत्रातील बांधकामांना सीआरझेड अधिसूचना २०११ मधील तरतुदीनुसार सीआरझेड विषयक परवानगी देण्याची कार्यवाही महाराष्ट्र सागरी क्षेत्र व्यवस्थापन प्राधिकरणामार्फत करण्यात येते. महाराष्ट्राच्या सागरतटीय क्षेत्राच्या दृष्टीने विचार करता सीआरझेड अधिसूचना २०११ मध्ये

विशेष देखभालीची गरज असलेल्या क्षेत्रामध्ये बृहन्मुंबईचा समावेश करण्यात आला आहे. बृहन्मुंबई क्षेत्रातील कोळींवाडयांचा विकास तसेच मोडकळीस आलेल्या धोकादायक व सेस इमारतींच्या पुनर्विकासाच्या दृष्टीने विशेष तरतुदींचा अंतर्भाव करण्यात आला आहे.

राज्याच्या ७ तटीय जिल्ह्यांचे सागर तटीय व्यवस्थापन नकाशे (CZMP) व उच्चतम भरती रेषा National Centre for Sustainable Coastal Management, Chennai या केंद्र शासन प्राधिकृत संस्थेमार्फत निश्चित करण्यात आली आहेत. तसेच सदर उच्चतम भरती रेषेवरून, प्रारुप सागर तटीय व्यवस्थापन आराखडे (CZMP) Institute of Remote Sensing, Chennai व National Center for Earth Science & Studies, Kerela केंद्र शासन प्राधिकृत संस्थामार्फत तयार करण्यात आले असून सदर नकाशावर जन सुनावणी घेण्यात आली आहे.

केंद्रीय पर्यावरण, वने व वातावरणातील बदल, नवी दिल्ली यांनी दिनांक १६/०८/२०१८ रोजीच्या पत्राद्वारे मुंबई शहर, मुंबई उपनगर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या पाच जिल्ह्यांसाठीचे सागर तटीय व्यवस्थापन नकाशे (CZMP) मंजूर केले आहेत. तसेच ठाणे, पालघर व नवी मुंबई क्षेत्राचे सागर तटीय व्यवस्थापन नकाशे (CZMP) दिनांक २२/२/२०१९ रोजी मंजूर केले आहेत. सदर सीआरझेड नकाशे प्राधिकरणाच्या http://mczma.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

सद्यस्थितीत, केंद्र शासनाने सिआरझेड अधिसुचना, २०११ रद्द करून नवीन सिआरझेड अधिसुचना १८ जानेवारी, २०१९ रोजी जाहीर केली असून त्या अंतर्गत सिआरझेड नकाशे सुधारित करणे अपेक्षित आहे. त्यानुषंगाने, केंद्र शासन प्राधिकृत संस्था National Centre for Sustainable Coastal Management, Chennai यांचे मार्फत सिआरझेड नकाशे सुधारित करण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे".

## ३. जैविक वैद्यकीय कचरा

रूग्णालये, पॅथॅलॉजिकल लॅबोरेटरी, रासायनिक प्रयोगशाळा इत्यादी मधून निघणाऱ्या घनकचऱ्यावर शास्त्रोक्तरित्या प्रक्रिया करणे पर्यावरणदृष्ट्या आवश्यक असते. याबाबत पर्यावरण संरक्षण कायद्यांतर्गत केंद्र शासनाने बायोमेडीकल वेस्ट अधिसूचना दिनांक २० जुलै, १९९८ रोजी जारी केली होती. आता, केंद्र शासनाने दिनांक २८ मार्च, २०१६ रोजीच्या अधिसूचनेद्वारे जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापन नियम, २०१६ जारी केले आहेत. जैव-वैद्यकीय कचरा व्यवस्थापन नियम, २०१६ मधील नियम ११ (१) नुसार प्रधान सचिव (आरोग्य) यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय सल्लागार समिती दि. १३/०४/२०१७ रोजीच्या शासन निर्णयाद्वारेस्थापन करण्यात आली आहे. शासकिय अधिसूचना दि.०७/०३/२०२२ प्रमाणे अतिरिक्त मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समिती व जिल्हा अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समिती जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापनासाठी गठीत करण्यात आलेली आहे.

म.प्र.नि. मंडळाकडून जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापना करिता जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापन नियम, २०१६ अंतर्गत सामाईक जैव वैद्यकीय कचरा प्रक्रिया केंद्रांची सभासद नोंदणी व बॉम्बे नर्सिंग होम नोंदणी, तसेच रुग्णालयातून निर्माण होणाऱ्या सांडपाणी आणि /अथवा हवा प्रदूषण करणाऱ्या यंत्रणा इ.करिता जल प्रदूषण (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण), कायदा, १९७४, हवा प्रदूषण (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण ), कायदा , १९८१ अंतर्गत अनुक्रमे जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापन प्राधिकारपत्र (ऑथोरायझेशन ) आणि संमतीपत्र (कन्सेंट) घेणे व वैध असणे बंधनकारक आहे. संमतीपत्र (कन्सेंट) आणि प्राधिकारपत्र (ऑथोरायझेशन) न घेणाऱ्या वैद्यकीय आस्थापनांविरुद्ध (Hospitals) म.प्र.नि. मंडळाकडून दंडात्मक व फौजदारी स्वरूपाची कारवाई करण्यात येते.

संपूर्ण महाराष्ट्रात जैव वैद्यकीय कचऱ्याची विल्हेवाट हि ३० सामाईक जैव वैद्यकीय कचरा प्रक्रिया केंद्रामार्फत लावली जाते. ज्या मध्ये उच्च तापमानावर कचऱ्याचे भस्मीकरण, प्लास्टिक कचऱ्याचे

निर्जंतुकीकरण करून त्याचे लहान तुकडे करून प्लास्टिक मॅन्युफॅक्चरिंग साठी देणे या प्रक्रियनाचा समावेश होतो.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मुख्यालयाकडून तसेच प्रादेशिक कार्यालयांकडून जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापन नियम, २०१६ बाबत अंमलबजावणीकरीता वैद्यकिय व्यवसायाशी निगडीत विविध संस्था तसेच जिल्हाधिकारी, जिल्हा शल्य चिकत्सक, पालिका आयुक्त इत्यादींकडे सातत्याने पाठपुरावा करण्यात येतो.

जैव वैद्यकीय कचरा (व्यवस्थापन आणि हाताळणी) नियम, १९९८ मधील नियम क्रमांक ८(३) नुसार पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या दिनांक १० एप्रिल, २००३ च्या शासन निर्णयान्वये जैव वैद्यकीय कचरा (व्यवस्थापन आणि हाताळणी) नियम, १९९८ च्या अंतर्गत प्राधिकारपत्र (BMW Authorization) सुधारित शुल्क आकारण्यात येत होते, सदरील शुल्क हे दि. १०/१०/२०२२ रोजीच्या शासन निर्णयाने रद्द करण्यात आले आहे. सर्व वैद्यकीय आस्थापनांना दि. २५/८/२०११ मध्ये नमूद शासन निर्णयानुसार अथवा त्यामध्ये वेळोवेळी केल्या जाणाऱ्या सुधारणेनुसार आवश्यक संमतीपत्र शुल्क अदा करून सामायिक संमतीपत्र व जैव वैद्यकीय कचरा व्यवस्थापन प्राधिकारपत्र (Combined Consent and BMWM Authorization) घेणे अनिवार्य राहील.

## **४. सामायिक सांडपाणी संयंत्रणा योजना** -

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने स्थापन केलेल्या रासायनिक कारखान्यांच्या औद्योगिक क्षेत्रामध्ये सांडपाणी प्रक्रिया व विल्हेवाट परिणामकारक रित्या होणे आवश्यक आहे. त्यासाठी राज्यात सामायिक सांडपाणी संयंत्र योजना, खास करून रासायनिक औद्योगिक क्षेत्रासाठी हाती घेण्यात आलेली आहे. या योजने अंतर्गत २० टक्के अनुदान महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, ५ टक्के अनुदान महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ व उर्वरित रक्कम कारखान्यांनी उभारावयाची आहे. महाराष्ट्रात तारापूर, ठाणे-बेलापूर, डोंबिवली, अंबरनाथ, बदलापूर, तळोजा, रोहा, महाड, पाताळगंगा, लोटे-परशुराम, जयसिंगपूर, इ. औद्योगिक वसाहतीत एकूण २६ ठिकाणी सामूहिक सांडपाणी प्रक्रिया सयंत्रणा उभारण्यात आल्या आहेत.

मा. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या जनहित याचिका क्र. १७/२०१३ निकोलस अल्मेडा विरुध्द महाराष्ट्र शासन या न्यायालयीन प्रकरणात राज्यातील ८ मोठ्या एम.आय.डी.सी. क्षेत्रांतील (जसे महाड, लोटेपरशुराम, चिंचोली, बदलापूर, रोहा, मोरीवली, तारापूर आणि चिकोली) कार्यरत असलेल्या सीईटीपीच्या कामकाजाच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाने दिनांक ०२/०२/२०१३ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने सीईटीपीच्या कामकाजावर नियंत्रण ठेवण्यासाठी राज्यस्तरीय समन्वय समितीची स्थापना करण्यात आली आहे.

**५. राष्ट्रीय हरित सेना योजना -**

राष्ट्रीय हरित सेना ही १०० टक्के केंद्र पुरस्कृत महत्वाकांक्षी योजना असून शालेय विद्यार्थ्यांद्वारा त्यांच्या प्रत्यक्ष सहभागातून पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृती करणे हा या योजनेचा उद्देश आहे.

ही योजना सन २००२ पासून सुरू झाली असून महाराष्ट्रात प्रत्येक जिल्ह्यात प्रत्येकी २५० इको क्लब निर्माण करण्यात आले आहेत. प्रत्येक इको क्लबमध्ये ५० विद्यार्थ्यांना समाविष्ट करण्यात येते. आतापर्यंत राज्यात ८८९८ इको क्लब्स स्थापन करण्यात आले असून त्यामध्ये सुमारे ४,४२,५०० विद्यार्थी सहभागी झाले आहेत. या इको क्लब्स मार्फत स्मृतीवन विकास, बीज भंडार ( Seed Bank), फटाक्यांचे दुष्परिणाम तसेच ध्वनी व जल प्रदूषण इत्यादी बाबत विविध लघु प्रकल्प राबविण्यात येतात. यासाठी इको क्लबला केंद्र शासना द्वारे रु.२,५०० अनुदान देण्यात येते.

**६. जिल्हा पर्यावरण समिती -**

जिल्हा पर्यावरण संवर्धनात व संरक्षणात स्थानिक यंत्रणेच्या व जनतेच्या सहभागाचे महत्व लक्षात घेऊन केंद्रीय पर्यावरण मंत्रालयाने देशातील प्रत्येक राज्यात प्रदूषण नियंत्रण मंडळाव्यतिरिक्त जिल्हा पातळीवर जिल्हा पर्यावरण समिती गठीत करण्याबाबत निर्देश त्यांच्या दिनांक ३० डिसेंबर, १९८८ च्या पत्राद्वारे दिलेले आहेत. ही समिती स्थानिक पर्यावरणाशी संबंधीत बाबींवर लक्ष केंद्रित करेल. जन सहभागाने स्थानिक पर्यावरणाशी संबंधित बाबींवर लक्ष केंद्रित करेल. जन सहभागाने स्थानिक पर्यावरणाच्या समस्या जाणून घेऊन त्यावर उपाय योजना सुचविणे, जनजागृती करणे, जिल्ह्यातील विविध नैसर्गिक संसाधनांचे सर्वेक्षण करून त्या संसाधनांच्या संवर्धनासाठी शासनास शिफारसी करणे, तसेच शासनास जिल्ह्यातील पर्यावरण संवर्धनासाठी योग्य त्या शिफारसी करणे / सल्ला देणे, ही समिती केवळ सल्लागार समिती म्हणून कार्य किंवा राज्य शासनाने ठरविल्यास जिल्हा प्रशासनामध्ये सुद्धा औपचारीकरित्या पर्यावरण संवर्धनासाठी प्रशासनिक कार्य करू शकेल.

जिल्हा पर्यावरण समिती शासन निर्णय जावक क्रमांक जिपस-२०१४/प्र.क्र.९५/तां.क.३, दिनांक ०१ सप्टेंबर, २०१५ अन्वये पुनर्रचित व पुर्नगठीत करण्यात आली आहे.

| | |
|---|---|
| १. जिल्हाधिकारी | ... अध्यक्ष |
| २. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद | ... सदस्य |
| ३. जिल्हा उद्योग अधिकारी | ... सदस्य |
| ४. जिल्हा कृषी अधिकारी | ... सदस्य |
| ५. जिल्हा आरोग्य अधिकारी | ... सदस्य |
| ६. कार्यकारी अभियंता, जल संपदा विभाग | ... सदस्य |
| ७. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग | ... सदस्य |
| ८. जिल्हा जन संपर्क व माहिती अधिकारी | ... सदस्य |
| ९. जिल्हा वन अधिकारी | ... सदस्य |
| १०. अध्यक्ष नामनिर्देशित केलेले पर्यावरण क्षेत्रातील तज्ञ २ (प्रतिनिधी) | ... सदस्य |
| ११. अध्यक्षांनी नामनिर्देशित केलेले पर्यावरण क्षेत्रात काम करणाऱ्या जिल्ह्यातील शासकिय सेवा भावी संस्थेचे २ प्रतिनिधी | ... सदस्य |
| १२. जिल्ह्यातील सर्व आमदार | ... सदस्य |
| १३. प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ | ... सदस्य सचिव |

शासकिय सदस्यांव्यतिरिक्त इतर सदस्यांचा समितीमधील कालावधी हा दोन वर्षासाठी असतो. दोन वर्षानंतर समितीचे अध्यक्ष त्यांच्या स्तरावर सदस्यांचे नवीन नामनिर्देशन करतात व तसे शासनास कळवितात. अध्यक्षांना आवश्यक वाटल्यास ते जिल्ह्यातील इतर लोक प्रतिनिधींना व इतर शासकिय अधिकाऱ्यांना स्थानिक विषयाच्या निकडीनुसार आमंत्रित करू शकतात.

**(अ) समितीचे कामकाज व कार्य कक्षा -**

१. जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांनी तयार केलेल्या पर्यावरणाच्या सद्यस्थिती अहवालावर सखोल चर्चा करून शिफारस करणे व असा अहवाल प्रत्येक स्थानिक स्वराज संस्थेकडून प्राप्त करून घेणे.

२. जिल्ह्यातील पर्यावरणाचा ऱ्हास झालेल्या नैसर्गिक संसाधनाचे सर्वेक्षण करून अशा संसाधनाच्या संवर्धनासाठी शासनास शिफारस करणे व शासनाच्या मान्यतेने उपाय योजनांच्या अंमल बजावणीसाठी संनियंत्रण करणे.

३. जिल्हा स्तरावर पर्यावरण दिन, वसुंधरा दिन, जल साक्षरता दिवस, ओझेन संरक्षण दिवस, वेट लॅण्ड कन्झर्व्हेशन दिवस, वृक्षारोपण मोहीम, प्लॉस्टिक निर्मूलन मोहीम, प्लॉस्टिक पिशव्यांच्या बंदीबाबत जनजागृती, शाळा-कॉलेजांमध्ये पर्यावरण शिक्षण व जनजागृती स्पर्धा व कार्यक्रम इत्यादी राबविण्यासाठी कृती आराखडा तयार करून त्याची अंमल बजावणी करणे.

४. पर्यावरण व वातावरणीय बदल विभागा मार्फत जिल्ह्यात कार्यरत असलेल्या योजनांच्या योग्य त्या अमंलबजावणीसाठी विभागा मार्फत योजना निहाय वा एकत्रित स्वरुपात निर्गमित सुचनानुसार कार्यवाही करणे.

५. जिल्ह्यातील नव्याने प्रस्थापित होणाऱ्या विकास प्रकल्पासाठी तयार करण्यात येणाऱ्या " पर्यावरण आघात मूल्यांकन अहवाल " व " जन सुनावणी " बाबत संबंधित प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी समितीस सूचित करावे. यानुसार समितीने आपली मते जन सुनावणी दरम्यान आवश्यकतेनुसार विहित कार्य पद्धतीने नोंदवावी.

६. सद्यस्थितीत अस्तित्वात असलेल्या विकास योजना/प्रकल्पांमुळे होणाऱ्या जिल्ह्यातील पर्यावरण ऱ्हासावर उपाय योजना शासनास सुचविणे व शासनाच्या निदेशानुसार त्यावर अंमल बजावणी करणे.

७. पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६ अंतर्गत निर्गमित करण्यात आलेल्या अधिसूचना क्र. एसओ-३९४ (ई), दिनांक १६.०४.१९८७ अन्वये जिल्हाधिकारी यांना प्रदान केलेले अधिकार, जिल्हाधिकारी समितिचे अध्यक्ष या नात्याने जिल्हा स्तरावर पर्यावरण संरक्षणासाठी व संवर्धनासाठी आवश्यकतेनुसार वापरतील. तसेच पर्यावरण ऱ्हासास कारणीभूत ठरत असलेल्या/ ठरणा-या घटकांवर/संस्थांवर या कायद्यान्वये प्राप्त अधिकारानुसार, समितीचे अध्यक्ष कारवाई करतील किंवा कारवाई करण्यासाठी शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागास शिफारस करतील.

८. समिती पर्यावरण ऱ्हासाबाबत प्राप्त होणाऱ्या तक्रारींची स्थानिक पातळीवर त्वरीत दखल घेईल व त्यासाठी आवश्यक ती कार्यवाही संबंधित यंत्रणांच्या माध्यमातून करेल.

## ७. इको सेन्सिटीव्ह क्षेत्र -

महाबळेश्वर हे थंड हवेचे ठिकाण दिनांक १७.०१.२०११ च्या केंद्र शासनाच्या अधिसूचनेनुसार पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले आहे.

महाराष्ट्रातील माथेरान हे थंड हवेचे ठिकाण केंद्र शासनाच्या दिनांक ०४.०२.२००३ च्या आदेशा द्वारे पर्यावरणीयदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले आहे.

या क्षेत्रांमध्ये पर्यावरण विषयक बाबींचे नियमन करण्यासाठी उच्चस्तरीय समितीची स्थापना करण्यात आलेली आहे. नगर विकास विभागा मार्फत या क्षेत्रातील विकासाचे नियमन करण्यासाठी झोनल व सब-झोनल मास्टर प्लान तयार करण्याचे काम प्रगती पथावर आहे. तसेच या क्षेत्रासाठी पर्यटन आराखडा तयार करण्याचे काम पर्यटन विभागा मार्फत करण्यात येत आहे.

## ८. राष्ट्रीय नदी कृती योजना -

I) राष्ट्रीय नदी कृती योजनेंतर्गत देशातील प्रमुख नद्यांच्या प्रदूषित पट्ट्यांचे शुद्धिकरण करण्याकरिता केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय नदी कृती योजना राबिण्यात येत आहे. नद्यांचे प्रदूषण मुख्यत्वे करून शहरी सांडपाण्यामुळे होत असल्याने नदीच्या काठावरील शहरांचे सांडपाणी योग्य प्रकारे प्रक्रिया करून विल्हेवाट लावणे हा या योजनेचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय नदी कृती योजना ही केंद्र शासन पुरस्कृत योजना असून यातील ७० टक्के हिस्सा केंद्र व ३० टक्के हिस्सा राज्य शासन / संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेने करावयाचा आहे

II) या योजने अंतर्गत त्र्यंबकेश्वर, नाशिक, कराड, नांदेड, सांगली, प्रकाशा (शहादा), कोल्हापूर या शहरांची कामे पूर्ण झालेली आहेत.

III) सन २०१५-१६ मध्ये पुणे शहरातील मुळा-मुठा नदी संवर्धनासाठी केंद्र शासनाने रु. ९९०.२६ कोटींचा प्रस्ताव मंजूर केलेला आहे. सदर प्रकल्पासाठी खर्चाचा केंद्र शासनाचा रु. ८४१.७२ कोटी (८५%) व पुणे महानगरपालिकेचा रु. १४८.५४ कोटी (१५%) हिस्सा आहे. मुळा-मुठा नदी संवर्धनाचे काम प्रगती पथावर आहे.

IV) राष्ट्रीय नदी संवर्धन योजनेतंर्गत नागपूर महानगरपालिकेच्या नाग नदीचा रु. २४१२.६४ कोटी रुपयाच्या प्रस्तावास दिनांक ११.११.२०१९ रोजी मान्यता दिलेली आहे. सदर प्रकल्पासाठी खर्चाचा केंद्र शासन, राज्य शासन व नागपूर महानगरपालिका यांचा हिस्सा अनुक्रमे ६०:२५:१५ असणार असून तो प्रत्येकी रु. १४४७.५८ कोटी रु. ६०३.१६ कोटी व रु. ३६१.८९ कोटी इतका आहे. सदर प्रस्तावाबाबत अंतिम मान्यता व निधी वितरण केंद्र शासनाकडे प्रलंबित आहे.

## ९. राज्य नदी संवर्धन योजना-

I) शासन निर्णय क्र. संकीर्ण २०११/प्र.क्र.२५/तां.क.१ दिनांक१ मार्च, २०१४ अन्वये राज्य नदी संवर्धन योजना सूरू करण्यात आली आहे. या योजनेंतर्गत शहरातून/गावातून निघणारे सांडपाणी नदीत ज्या ठिकाणी सोडले जाते तेथून गोळा करणे, अडविणे व सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा तयार करणे ही मुख्य कामे अंतर्भूत आहेत. प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा, प्रकल्प क्षेत्रातील किंवा जवळील शेती, उद्योग, बाग-बगीचे इत्यादी मध्ये पुनर्वापर व पुनर्चक्रण शक्य होण्यासाठी आवश्यक ती यंत्रणा, सुविधा /व्यवस्था इत्यादी उभारण्यात येईल, जेणेकरुन प्रकल्पाच्या देखभालीचा खर्च भागविणे शक्य होईल. या योजनेत नदीच्या जवळील भागात कमी किमतीची

स्वच्छतागृहे बांधणे, नदी घाट विकास, नदी काठाची धूप रोखण्यासाठी उपाययोजना आणि शास्त्रीय पध्दतीने नागरी घनकचरा व्यवस्थापन व विल्हेवाट ही कामे अंतर्भूत आहेत. सदर योजनेंतर्गत नदी काठावरील "ड" वर्ग महानगरपालिका आणि सर्व नगरपालिका/ नगरपरिषदांमधील १५,००० लोकसंख्या असलेल्यांसाठी शासनाचा हिस्सा ८० टक्के तर संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेचा हिस्सा २० टक्के असेल. या योजनेंतर्गत, प्रकल्पाच्या तांत्रिक छाननीनंतर प्रकल्प सचिव स्तरावरील प्रदत्त समितीच्या शिफारसीनंतर शासनाकडून मान्यता देण्यात येते.

II) "नमामि चंद्रभागा" अभियान राबविण्याच्या अनुषंगाने पर्यावरण विभागाच्या दिनांक२४.०३.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये रु. १६.८० कोटी इतका निधी विभागीय आयुक्त, पुणे यांना वितरीत करण्यात आलेला आहे. सदर प्रकल्प प्रगती पथावर आहे.

III) राज्य नदी संवर्धन योजनेंतर्गत सन २०१९-२० या वर्षात गोदावरी नदी, मोसम नदी, उल्हास नदी व अमरावती नदी या ४ नद्यांच्या नदी संवर्धन प्रस्तावांना प्रशासकीय मान्यता दिली आहे. सदर ४ नद्यासांठी राज्य शासनाचा हिस्सा ३८ कोटी इतका आहे. तसेच सन २०२१-२२ मध्ये चुडामणि नदी संवर्धनाच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यापैकी गोदावरी नदी-नांदेड, मोसम नदी-मालेगाव व चुडामणि नदी-वरूड यांना सन २०२१-२२ मध्ये रु.१९.५० कोटी इतका निधी वितरित केलेला आहे.

## १०. राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजना -

I) केंद्रीय पर्यावरण वने व जलवायू परिवर्तन मंत्रालयाने त्यांच्या नॅशनल प्लॅन फॉर कॉन्झरवेशन ऑफ ॲक्वेटीक इकोसिस्टीम (NCPA) या केंद्र पुरस्कृत योजने अंतर्गत राज्यातील तलाव, सरोवर व मोठे जलाशय यांचे पर्यावरणीयदृष्टया संवर्धन करण्यासाठी योजना राज्यांतर्गत राबविण्यात येत आहे. या योजने अंतर्गत शहरी व निमशहरी भागातील प्रदुषित व पर्यावरणीयदृष्टया दर्जा खालावलेल्या तलावांचे संरक्षण व संवर्धन करण्यात येते.

II) केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व जलवायू परिवर्तन विभागाने रुपये ४३.९६ कोटीच्या कोराडी तलावाच्या संवर्धनाच्या कामास मान्यता दिली आहे. त्याअंतर्गत ६० % केंद्र शासनाचा व ४० % महानिर्मिती कंपनीचा सहभाग असून सदर मान्यतेनुसार केंद्र शासनाचा हिस्सा रुपये २६.२१ कोटी व राज्य शासनाच्या वतीने महानिर्मिती कंपनीचा सहभाग रुपये १७.४८ कोटी इतका आहे. कोराडी तलाव, नागपूर संवर्धनासाठी केंद्र शासनाकडून आतापर्यंत रु.२२ कोटी इतका निधी वितरित झालेला असून सदर निधी पर्यावरण विभागामार्फत नागपूर मेट्रोपोलिटन रिजनल डेव्हलपमेंट ऑथॅरीटी (NMRDA) यांना वितरीत करण्यात आलेला आहे.

III) केंद्र शासनाच्या पर्यावरण, वने व जलवायू परिवर्तन विभागाने रुपये १२.२१ कोटीच्या धर्मवीर संभाजी तलावाच्या संवर्धनाच्या कामास मान्यता दिली आहे. त्याअंतर्गत ६० % केंद्र शासनाचा व ४० % सोलापूर महानगरपालिकेचा सहभाग असून सदर मान्यतेनुसार केंद्र शासनाचा हिस्सा रुपये ७,३२,६७,८००/- व राज्य शासनाच्या वतीने सोलापूर महानगरपालिकेचा सहभाग रुपये ४,८८,४५,२००/- इतका आहे. धर्मवीर संभाजी तलाव, सोलापूर संवर्धनासाठी केंद्र शासनाकडून आतापर्यंत रु.६.६६ कोटी इतका निधी वितरित झालेला असून सदर निधी पर्यावरण विभागा मार्फत सोलापूर महानगरपालिका यांना वितरीत करण्यात आलेला आहे.

## ११. राज्य सरोवर संवर्धन योजना -

I) राज्यातील जलाव, सरोवर व मोठे जलाशय यांचे पर्यावरणीयदृष्टया संवर्धन करण्यासाठी योजना राज्यांतर्गत राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत शहरी व निमशहरी भागातील प्रदुषित व पर्यावरणीयदृष्टया दर्जा खालावलेल्या तलावांचे संरक्षण व संवर्धन करण्यात येते. राज्य शासनाचा जास्तीत जास्त ७०-९० टक्के हिस्सा देण्यात येतो. उर्वरित हिस्सा स्थानिक यंत्रणेने उपलब्ध करावयाचा आहे. "अ" वर्ग नगरपरिषद व महानगरपालिका / विश्वस्थ संस्था / शासकीय सेवाभावी संस्था/ कटक मंडळे-३० टक्के, "ब" वर्ग नगरपरिषद-२० टक्के, "क" वर्ग नगरपरिषद व ग्रामीण क्षेत्र -१० टक्के.

II) या योजनेत सन २००७ पासून सन २०२०-२१ पर्यंत राज्य सरोवर योजनेअंतर्गत एकूण ८० तलावांचे पर्यावरणीयद्दष्टया संवर्धनाचे प्रकल्प हाती घेण्यात आलेले आहेत. सदर ८० तलावांची एकूण मंजूर रक्कम रु.१८४.८० कोटी इतकी असून त्यापैकी राज्य शासनाचा हिस्सा रु.१५५.५१ कोटी इतका आहे. सदर ८० तलाव संवर्धनासाठी राज्य हिस्स्यापैकी रु.१००.०७ कोटी एवढा निधी वितरित करण्यात आलेला आहे.

III) **सन २०२१-२२ या आर्थिक वर्षात** एकूण २३ नवीन तलाव प्रस्तावांना तत्वत: मान्यता देण्यात आली असून त्यापैकी १२ तलावांना रु. ११.४९ कोटी इतका निधी वितरित करण्यात आला आहे. तसेच यापूर्वी प्रशासकीय मान्यता मिळालेल्या ८० तलावांपैकी उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त झालेल्या १५ तलावांना एकूण १८.४३ कोटी इतका निधी असे **एकूण रु.२९.९२ कोटी इतका निधी वितरित करण्यात आला आहे.**

## १२. मुंबई शहराचा पर्यावरण विषयक कृती आराखडा -

केंद्र शासनाच्या पर्यावरण मंत्रालयाने मुंबई शहरातील व परिसरातील वाढते प्रदूषण लक्षात घेता पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६ च्या अनुसार निरनिराळ्या पर्यावरण विषयक बाबींच्या आधारावर मुंबई प्रदेशासाठी पर्यावरण विषयक कृती आराखडा तयार केला आहे. या आराखड्यामध्ये (१) वाहनांपासून व कारखान्यांपासून होणारे प्रदूषण नियंत्रण करणे (२) वाहनांची नियमित तपासणी करणे, प्रदूषणरहित वाहनांचा वापर करणे, वाहनांसाठी कॉम्प्रेस्ड नॅचरल गॅस (CNG) चा वापर करण्यास प्रोत्साहीत करणे. (३) उद्योगांपासून धोकादायक व घातक घनकचऱ्याचे व्यवस्थापन / विल्हेवाट करणे (४) रहिवाशी क्षेत्रात ध्वनीचे प्रदूषण रोखणे व संनियंत्रण करणे (५) मलशुद्धीकरण केंद्र बांधणे व कार्यान्वित करणे, संपूर्ण शहरी भागासाठी मलनि:सारण योजना राबविणे (६) घनकचरा जमा करणे, वाहून नेणे व विल्हेवाट लावणे, घरोघरी जाऊन घनकचरा जमा करणे व वाहतूक करण्याबाबत स्थानिक स्वराज्य संस्था यांनी योजना राबविणे, कचरा जमा करण्याच्या व वाहतूक पद्धतीचे आधुनिकीकरण व कंपोस्टिंग, व्हर्मीकल्चर यांना प्रोत्साहन देणे.

वर नमूद केलेल्या निरनिराळ्या पर्यावरण विषयक बाबींचा अभ्यास करून योग्य ती कार्यवाही करण्यासाठी मुंबई प्रदेशातील निरनिराळ्या संस्था कार्यरत आहेत. या संस्थांकडून वरील कार्यामध्ये योग्य तो सहभाग घेऊन मुंबईतील पर्यावरण सुधारण्याचा प्रयत्न सुरु आहे.

## १३. ध्वनी प्रदूषण नियमन -

सार्वजनिक ठिकाणी वातावरणात ध्वनीची तीव्रता वाहतूक व इतर कारणामुळे वाढत आहे. ध्वनी प्रदूषणामुळे नागरिकांच्या आरोग्यावर व मानसिक स्वास्थावर अनिष्ट परिणाम होत असल्यामुळे ध्वनी प्रदूषण नियमन व नियंत्रण करण्यासाठी केंद्र सरकारच्या पर्यावरण विभागाने दिनांक १४ फेब्रुवारी, २००० रोजी ध्वनी प्रदूषण नियम, २००० लागू केलेला आहे.

या नियमानुसार ध्वनी प्रदूषणाच्या दृष्टीने निरनिराळ्या क्षेत्रांचे उद्योग, वाणिज्य, निवासी व शांतता झोन असे प्रभाग पाडण्यात आले असून प्रत्येक भागासाठी ध्वनीच्या पातळीचे प्रमाण ठरवून देण्यात आलेले आहे. नियमांची प्रभावीपणे अंमल बजावणी करण्यासाठी शासनाने -

1. दिनांक २१ एप्रिल, २००९ व दिनांक ०७ डिसेंबर, २००९ रोजी सुधारित शासन निर्णय काढलेले आहेत. त्यानुसार खालील प्रमाणे शांतता झोन जाहीर करण्यात आले आहेत.

(अ) शैक्षणिक संस्थेच्या सभोवताली १०० मीटर क्षेत्र शांतता झोन.
(ब) सर्व न्यायालयाच्या सभोवताली १०० मीटर क्षेत्र शांतता झोन.
(क) रुग्णालयांच्या सभोवताली १०० मीटर क्षेत्र शांतता झोन.

सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या कार्यक्षेत्रामध्ये व ग्रामीण क्षेत्रांमध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी शांतता झोन त्वरित जाहीर करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

१. त्याचप्रमाणे, शासनाच्या संबंधित विभागाच्या अधिपत्याखालील संस्थांच्या खालील अधिकाऱ्यांना पदनाम प्राधिकरण म्हणून जाहीर करण्यात आले आहे.
- महसूल विभागाशी संबंधित जिल्हादंडाधिकारी.
- नगर विकास विभाग-महानगर पालिका आयुक्त, अतिरिक्त/उपायुक्त, नगर पालिकांचे मुख्याधिकारी.
- उच्च व तंत्र शिक्षण विभाग - प्रबंधक / पोलीस उप अधीक्षकाच्या दर्जापेक्षा कमी नसलेले शासकीय रुग्णालयाचे अधीक्षक.
- नगर विकास विभाग - एमएमआरडीए, एमएमआरडीसी, सिडको.
- पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग - सदस्य सचिव आणि पोलीस उप अधीक्षकाच्या दर्जापेक्षा कमी नसलेले महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे कोणतेही अधिकारी.

**गृह विभाग** -

(अ) पोलीस उप अधीक्षक दर्जापेक्षा कमी नसलेले महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाचे अधिकारी, उप प्रादेशिक अधिकारी.
(ब) पोलीस उप अधीक्षकाच्या दर्जापेक्षा कमी नसलेले एस.टी. महामंडळाचे अधिकारी / आगार व्यवस्थापक.
(क) पोलीस उप अधीक्षकाच्या दर्जापेक्षा कमी नसलेले वाहतूक पोलीस अधिकारी.

सणांच्या वेळी फटाक्यांमुळे होणारे ध्वनी व हवा प्रदूषण रोखण्यासाठी पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाने दिनांक १०.१०.२००२ च्या परिपत्रकान्वये १२५ डेसीबल पेक्षा जास्त आवाज करणाऱ्या फटाक्यांच्या

उत्पादन, विक्री व वापर यावर बंदी घातलेली आहे. साखळी फटाक्यांच्या उत्पादन, विक्री व वापर यावर बंदी घातलेली आहे. साखळी फटाक्यात एकूण ५०,५० ते १०० व १०० व त्यापेक्षा जास्त फटाक्यांच्या साखळी असेल तर आवाजाची मर्यादा फटाका उडविण्याच्या जागेपासून ४ मीटर अंतरापर्यंत अनुक्रमे ११५,११० व १०५ डेसीबल एवढी असावी. तसेच रात्री १० ते सकाळी ६ वाजेपर्यंत दारूकाम व फटाके यांचा वापर करण्यास मनाई करण्यात आलेली आहे.

ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००२ च्या नियम ५ च्या उपनियम ३ नुसार ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक यंत्रणेचा वापर श्रोतेगृहे, सामूहिक सभागृह आणि मेजवानी कक्ष यासारख्या बंद जागेखेरीज इतर ठिकाणी शासन निर्णयामध्ये विहित केल्याप्रमाणे, १५ दिवसांसाठी फक्त ध्वनीची विहित मर्यादा राखून सकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत करता येईल.

दिनांक १०/०८/२०१७ रोजीच्या केंद्र शासनामार्फत निर्गमित सुधारित नियम, २०१७ च्या अनुषंगाने सदर १५ दिवस ठरविण्याची जबाबदारी संबंधित राज्य शासन व राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या जिल्हा प्राधिकरणाची आहे. सबब, पर्यावरण विभागाने शासन निर्णय क्र. ध्वनीप्र २००९/प्र.क्र.१२/०८/तांक-१, दिनांक २२/०८/२०१७ अन्वये वर्षातील हे १५ दिवस ठरविण्यासाठी संबंधित जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांना प्राधिकृत केलेले आहे.

शासनाने दिनांक २८/०७/२०१५ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे ध्वनी प्रदूषण (नियंत्रण व नियमन) नियम, २००० ची प्रभावीपणे अंमल बजावणी करण्यासाठी प्राधिकरणाची नियुक्ती केली आहे. त्यानुसार ध्वनी प्रदूषण (नियंत्रण व नियमन), २००० च्या २(क) नुसार आता राज्यातील पोलीस आयुक्त असलेल्या शहरांमध्ये पोलीस आयुक्त किंवा पोलीस उपायुक्त किंवा सहाय्यक पोलीस आयुक्त आणि इतर क्षेत्रांमध्ये संबंधित पोलीस अधीक्षक किंवा पोलीस उप अधीक्षक दर्जाचा अधिकारी यांची ध्वनी प्रदूषण नियमांची अंमल बजावणी करण्यासाठी ध्वनी प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. हे ध्वनी प्राधिकारी या नियमांच्या सुलभ अंमल बजावणीसाठी त्यांच्या कार्यक्षेत्रात विभाग निहाय/ वार्डनिहाय ध्वनी प्रदूषण अधिकारी प्राधिकृत करून संयंत्रणा विकसित करतील.

नियुक्त ध्वनी प्राधिकारी व त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांचे पत्ते, पदनाम, दूरध्वनी क्रमांक, ई मेल इत्यादी नागरीकांच्या माहितीसाठी विभागनिहाय/वार्डनिहाय मोक्याच्या ठिकाणी फलक लावावेत. स्थानिक वर्तमानपत्र व केबल नेटवर्कव्दारे वेळोवेळी प्रसिध्दी द्यावी आणि ही माहिती संकेतस्थळावर सुध्दा उपलब्ध करून देण्यात यावी. तसेच ध्वनी प्रदूषण संबंधीत तक्रार प्राप्त करून घेण्यासाठी १०० क्रमांकाच्या दूरध्वनी सेवेमध्ये याबाबींचा समावेश करुन ती कार्यान्वित करण्यात यावी, असे निर्देशित करण्यात आले आहे.

## १४ अ. प्लास्टीक कचरा व्यवस्थापन नियम, २०१६ -

भारत सरकार, पर्यावरण आणि वन मंत्रालयाद्वारा अधिसुचना संख्या का.आ.२४९ (अ), दिनांक ०४/०२/२०११ अंतर्गत प्लास्टीक कचरा (व्यवस्थापन व हाताळणी) नियम, २०११ प्रकाशित करण्यात आले होते व वेळोवेळी सुधारित करण्यात आले होते. सदर नियम अधिक परिणामकारक स्वरुपात लागू करण्याकरिता व प्लास्टीक कचरा न्युनतम करणे, स्त्रोत स्तरावर अलगीकरण करणे, पुर्नवापरावर जोर देण्याकरिता घरातून अथवा अन्य स्त्रोतांतून अथवा मध्यवर्ती सामग्री पुर्नप्राप्ती सुविधांतून निर्माण होणाऱ्या प्लास्टीक कचरा अंश गोळा करणारे कचरा वेचक, पुर्नवापर करणारे व कचरा संसाधकांना समाविष्ठ केले गेले असून कचरा व्यवस्थापन प्रणाली दीर्घकाळ टिकविण्याकरिता प्रदूषण करणाऱ्यांवर दंडात्मक रक्कम

आकारण्या बाबतच्या सिद्धांताचा समावेश करून जुन्या नियमांऐवजी नवीन प्लास्टीक कचरा अधिनियम २०१६ अधिसूचना संख्या क्र.सा.का. नि. ३२० (अ), दिनांक १८ मार्च २०१६ रोजी भारत सरकार, पर्यावरण, वन आणि जल वायू परिवर्तन मंत्रालय यांनी प्रकाशित केले आहेत. सदरील नियम हे १२ ऑगस्ट २०२१ रोजी आणि तदनंतर वेळोवेळी सुधारित करण्यात आले आहेत. सदरील सुधारणा महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या वेबसाईट वर उपलब्ध आहेत.

नवीन नियमांमध्ये प्लास्टिक पिशवी, प्लास्टिक शीट अथवा प्रकार किंवा प्लास्टिक शीट वा बहुस्तरीय पॅकेजिंगपासून बनविलेले आवरण यांच्या निर्मिती, आयात, भांडारण, वितरण, विक्री आणि व्यापारासंबंधी शर्तीचा समावेश केला आहे. निन्मलिखीत शर्तीपैकी विशिष्ट शर्ती म्हणजे अप्रयुक्त अथवा पुर्नचक्रीत प्लास्टिक पासून निर्माण केलेल्या प्लास्टिक पिशव्या हया ५० मायक्रॉनपेक्षा कमी जाडीच्या नसल्या पाहिजेत. तसेच नियमांमध्ये विशेषत: उत्पादक, आयातकर्ता व ब्रॅन्ड मालकांवर विस्तारित उत्पादक दायित्वांवर आधारीत कचरा व्यवस्थापन प्रणालीसाठी राज्य नगर विकास विभागांच्या संयोजनाद्वारा आराखडा तयार करावयाची व राबविण्याची जबाबदारी सोपविली आहे.

प्लास्टिक कचरा व्यवस्थापन नियमांच्या तरतुदींची प्रभावी अंमल बजावणी व सनियंत्रणासाठी महाराष्ट्र शासनाने सदर नियमांच्या तरतुदी अंतर्गत पत्र क्र. प्लास्टिक २०१३/(२८४/२०१३) तां.क.४, दिनांक ०४/०१/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये सचिव, नगर विकास विभाग यांच्या अध्यक्षतेखाली नविन राज्यस्तरीय सल्लागार समिती स्थापन केलेली आहे.

प्लास्टीक, थर्माकॉल आणि प्लास्टीक पिशव्यांचा पर्यावरणावर होणारा विपरीत परिणाम, नागरी क्षेत्रात त्यामुळे होणारी पूरसदृष्य परिस्थिती, कृषिक्षेत्राची हानी, सागरी जीवांवरील परिणाम, स्थानिक स्वराज्य संस्थांवर प्लास्टीक कचरा व्यवस्थापनामुळे येणारा वित्तीय भार तसेच मानवी आरोग्यावरील प्रतिकूल परिणाम यांमुळे एकदाच वापरले जाणारे प्लास्टीक तसेच थर्माकॉल उत्पादने, कटलरी इ. आणि प्लास्टीक व नॉन ओवनच्या पिशव्यांवर दिनांक २३.०३.२०१८ च्या अधिसूचनेन्वये संपूर्ण राज्यात बंदी घालण्यात आली आहे. तसेच दिनांक ११.०४.२०१८, दिनांक ३०.०६.२०१८ व दिनांक १४.०६.२०१९, दिनांक २२/०३/२०२२, व दिनांक १५/०७/२०२२ व दिनांक ३०.११.२०२२ अन्वये अधिसूचनेमध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्र प्लॅस्टिक आणि थर्मोकॉल अधिसूचनेची अंमलबजावणीसाठी प्राधिकृत आणि अधिकारप्राप्त अधिकारी : स्थानिक स्वराज्य संस्था, महसूल विभाग, जिल्हा परिषद, संचालक आरोग्य सेवा, शिक्षण मंडळाचे संचालक, पर्यटन पोलीस आणि पोलीस विभाग, उपायुक्त पुरवठा, राज्य कर विभाग, परिक्षेत्र वन अधिकारी.

प्रभावी अंमलबजावणीसाठी दोन दोन समित्या स्थापना केल्या आहेत. १) प्रधान सचिव, पर्यावरण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली तांत्रिक मार्गदर्शनासाठी तज्ञ समिती. २)माननीय मंत्री (पर्यावरण) यांच्या अध्यक्षतेखाली अधिसुचनेमध्ये आवश्यक सुधारणा ठरवण्यासाठी आणि अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी शक्तीप्रदत्त समिती.

भारत सरकार, पर्यावरण आणि वन मंत्रालयद्वारा १२ ऑगस्ट २०२१ रोजी सिंगल युज प्लास्टिक अधिसूचना २०२१ प्रकाशित केली आहे. त्या अंतर्गत विविध एकल वापर प्लास्टिक च्या वस्तू प्रतिबंधित केलेल्या आहेत. सदर बंदीच्या अंमलबजावणीसाठी भारत सरकार, पर्यावरण आणि वन मंत्रालयद्वारा १२ ऑगस्ट २०२१ रोजी सिंगल युज प्लास्टिक अधिसूचना २०२१ प्रकाशित केली आहे. त्या अंतर्गत विविध एकल वापर प्लास्टिक च्या वस्तू प्रतिबंधित केलेल्या आहेत. सदर बंदीच्या अंमलबजावणीसाठी माननीय मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्र राज्यस्तरीय विशेष कृतीदल (STF) ची स्थापना १२.१०. २०२१ रोजी करण्यात आली आहे.

तसेच, जिल्हास्तरावर जिल्हास्तरीय कृतीदल आणि शहर स्तरावर (दशलक्ष अधिक शहर) कृतीदलची स्थापना दिनांक २६.०४.२०२१ च्या शासन निर्णयाद्वारे करण्यात आली आहे. दक्षतेसाठी प्रत्येक शहर स्तरावर दक्षतापथके तयार करण्यात आली आहेत. जिल्हास्तरीय दक्षतापथकही स्थापन केले आहेत.

## १४.ब घन कचरा (व्यवस्थापन) अधिनियम, २०१६ -

केंद्रीय वने व पर्यावरण मंत्रालय यांनी सन २००० मध्ये नागरी घनकचरा (हाताळणी व व्यवस्थापन अधिनियम), २००० अधिसूचित केला होता. त्यानुसार महानगरपालिका व नगरपालिका यांनी नागरी घन कचऱ्याचे वर्गीकरण करणे, गोळा करणे, साठवणूक करणे व शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावणे बंधनकारक आहे. सदर नियम अधिक परिणामकारक स्वरुपात लागू करण्याकरिता, स्त्रोत स्तरावर अलगीकरण करणे, सदर नियमाची व्याप्ती वाढविणे, तसेच पुर्नवापरावर जोर देण्याकरिता घरातून निर्माण होणाऱ्या घन कचरा अंश गोळा करणारे, कचरा वेचक, पुर्नवापर करणारे व कचरा संसाधकांना समाविष्ट करण्यासाठी सुधारित घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६, दिनांक ०८/०४/२०१६ रोजी अधिसूचित केला आहे.

सदर नियमांतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थांवर, कचरा निर्माण करणाऱ्या संस्थेवर वेगवेगळया जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या आहेत. सदर नियमानुसार स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्यांच्या शहरातून निर्माण होणाऱ्या घनकचऱ्यावर शास्त्रीय पद्धतीने प्रक्रिया व विल्हेवाट लावणे बंधन कारक केले आहे. तसेच याबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून प्राधिकारपत्र घेणे बंधनकारक आहे.

महाराष्ट्रामध्ये ४१८ स्थानिक स्वराज्य संस्था आहेत. त्यामध्ये २८ महानगरपालिका, १६ "अ" वर्ग नगरपरिषद, ७४ "ब", १५१ "क" वर्ग नगरपरिषद, ०७ कॅन्टॉनमेंट बोर्ड व १४२ नगरपंचायत समाविष्ट आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांनी त्याच्या कार्यक्षेत्रात निर्माण होणारा घनकचरा हा घनकचरा व्यवस्थापन नियम, २०१६ च्या तरतुदींनुसार संकलन, वर्गीकरण, साठवणूक, वाहतूक, प्रक्रिया व विल्हेवाट लावणे गरजेचे आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने घन कचरा व्यवस्थापन अधिनियम, २०१६ च्या प्रभावी अंमल बजावणीसाठी खालील कार्यवाही/कारवाई केलेली आहे.

१. सर्व महानगरपालिकांना प्रत्येक वर्षाच्या निधी मध्ये २५% निधीची तरतूद घनकचरा व्यवस्थापन व सांडपाणी व्यवस्थापनाकरिता करणेबाबत निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार २८ पैकी २६ महानगरपालिकांनी २५% आर्थिक तरतुदीचा ठराव स्थायी समिती व सर्वसाधारण समितीमध्ये पारीत केलेला आहे.

२. मंडळाने प्राधिकार पत्राची छाननी करण्याकरिता व नागरी संस्थांना मार्गदर्शन करण्याकरिता तज्ञ समिती तयार केली आहे. त्यामध्ये ऑल इंडिया लोकल सेल्फ गर्व्हनमेंटचा अधिकारी तसेच निवृत्त उपायुक्त मुंबई महानगरपालिका यांचा समावेश आहे.

३. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने वेळोवेळी नगरपालिका व महानगरपालिका यांना कारणे दाखवा नोटीस, प्रस्तावित निर्देश तसेच अर्धशासकिय पत्राद्वारे घनकचरा व्यवस्थापन योग्यरितीने करणेबाबत निर्देश दिलेले आहेत.

## १४ क. घातक कचरा व्यवस्थापन -

पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ च्या कलम ६, ८, व २५ मधील तरतुदीनुसार, पर्यावरण व वन मंत्रालय, नवी दिल्ली यांनी विषारी व घातक पदार्थांच्या व्यवस्थापनाबद्दल खालील नियम अधिसूचीत केले आहेत.

घातक कचरा व इतर कचरा शास्त्रोक्तपणे हाताळण्यासाठी वने व पर्यावरण मंत्रालय, भारत सरकार यांनी दिनांक ०४/०४/२०१६ रोजी सुधारित घातक कचरा व इतर कचरा (व्यवस्थापन व वापर) नियम - २०१६ अधिसूचित केलेला आहे व सदर नियम राज्यात अंमलात आलेला आहे.

घातक टाकाऊ पदार्थांच्या विल्हेवाटीसाठी सामुहिक यंत्रणा उभारण्याबाबतची जबाबदारी राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाने महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळावर सोपविलेली आहे. या कामात आवश्यक ते सर्व तांत्रिक सहकार्य तसेच प्रकल्पाच्या एकूण खर्चाच्या ५ टक्के अर्थसहाय्य मंडळाकडून करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

महाराष्ट्रामध्ये ७२५७ उद्योग घातक कचरा निर्माण करणारे आढळून आलेले आहेत. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार अधिकारपत्र नसलेल्या उद्योगावर मंडळाकडून कार्यवाही करण्यात आली आहे. आतापर्यंत ११५६५ कारखान्यांनी सामायिक घातक कचरा प्रक्रिया व विल्हेवाटीसाठी सदस्यत्व स्वीकारलेले आहेत. त्यापैकी काही सदस्यांचे नांव दोन सुविधांमध्ये आहे.

सामाईक घातक कचरा प्रक्रिया व विल्हेवाट यंत्रणेचे सदस्यत्व स्वीकारलेले उद्योग पुढील प्रमाणे-

| | | |
|---|---|---|
| तळोजा | - | ४४२० |
| टी.टी.सी. | - | १५६० |
| रांजणगाव | - | ४४१४ |
| बुटीबोरी- | | ११७१ |
| | | ------ |
| **एकूण** | - | **११५६५** |

**घातक कचरा प्रक्रिया व विल्हेवाट यंत्रणेबाबतची माहिती :-**

| अ.क्र. | स्थळ | क्षमता | स्थिती |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | तळोजा | जमीन भरणी ३५०००० टन प्रति वर्ष भस्मिकरण ३.० टन प्रति तास | २००२ पासून कार्यरत आहे. भस्मिकरण संयत्रणा व जमीन भरणी कार्यान्वित आहे. म.प्र.नि. मंडळाने अतिरिक्त भस्मिकरण यंत्रणा ३ टन प्रति तास कार्यान्वित करण्यासाठी संमतीपत्र दिलेले आहे. |
| २ | टी.टी.सी. | जमीन भरणी १०००० टन प्रती वर्ष | २००४ पासून कार्यरत आहे. |
| ३ | बुटीबोरी, नागपूर | जमीन भरणी ६०००० टन प्रती वर्ष भस्मिकरण २५००० टन प्रति वर्ष १ टन/तास | जानेवारी २००७ पासून कार्यरत म.प्र.नि. मंडळाने भस्मिकरण यंत्रणा (Plasma Incineration Technology) १ टन प्रति तास कार्यान्वित करण्यासाठी संमतीपत्र दिलेले आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | रांजणगाव, पुणे | जमीन भरणी ६०००० टन प्रती वर्ष भस्मिकरण २५००० टन प्रति वर्ष ४ टन/तास | डिसेंबर २००६ पासून कार्यरत म.प्र.नि. मंडळाने भस्मिकरण यंत्रणा (Plasma Incineration Technology) ४ टन प्रति तास कार्यान्वित करण्यासाठी संमतीपत्र दिलेले आहे. |

जे उद्योग घातक कचऱ्याची साठवणूक उद्योग परिसरात करीत आहेत अशा उद्योगांना जवळच्या सामाईक प्रक्रिया संयत्रणांकडे पाठविण्याचे मंडळाने आदेश दिले आहेत.

घातक कचरा व इतर कचरा पुर्नचक्रीकरण प्रकल्पांना प्राधिकारपत्र देण्याच्या अनुषंगाने प्राप्त झालेल्या अर्ज (तंत्रज्ञानाची) छाननी करण्यासाठी एका तज्ञ समितीचे गठण करण्यात आले आहे व त्या समितीच्या अहवालानुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ कार्यवाही करते.

कचरा वाहतूक करणाऱ्या वाहतूकदारांनी मंडळाकडे प्राधिकारपत्रासाठी अर्ज करणे बंधनकारक आहे. मार्च, २०२३ पर्यंत घातक कचरा वाहून नेणाऱ्या १८१ वाहतूकदारांना मंडळाने अधिकारपत्रे दिली आहेत. तसेच घातक घनकचरा वाहतूक करणाऱ्या वाहनांवर नियंत्रण करणारी संगणकीय यंत्रणा १८१ वाहनांवर बसविण्यात आलेली आहेत.

तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने घातक घनकचरा निर्मितीबाबत वार्षिक अहवाल व संपूर्ण माहिती संकलित करण्याकरिता मुख्यालय स्तरावर कक्ष तयार केलेला आहे.

## १४ ड. ई-कचरा व्यवस्थापन नियम, २०१६ -

ई-कचरा शास्त्रोक्तपणे हाताळण्यासाठी वने व पर्यावरण मंत्रालय, भारत सरकार यांनी दिनांक ०२.११.२०२२ रोजी ई- कचरा (व्यवस्थापन) नियम, २०१६ अधिसूचित केला आहे. सदर नियम राज्यात दिनांक ०१.०४.२०२३ पासुन अंमलात आलेले आहेत. या नियमांतर्गत विविध शासकीय, निमशासकीय, उत्पादक, इ. वर जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे. या नियमांतर्गत विविध संस्थांवर सोपविण्यात आलेल्या जबाबदाऱ्या खालीलप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| **उत्पादक** | - | ई कचरा गोळा करणे व यासाठी लागणारे आवश्यक केंद्रे स्थापन करणे आणि हा गोळा झालेला ई कचरा अधिकृत ई कचरा व्यवस्थापन केंद्राकडे पाठविणे. या कामी लागणाऱ्या आर्थिक बाबींची तरतूद करणे, तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून संमतीपत्र घेणे बंधनकारक आहे. तसेच केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे रजिस्ट्रेशन करणे बंधनकारक आहे. |
| **रीफर्बिशर** | - | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून संमतीपत्र घेणे बंधनकारक असुन पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही, याची खबरदारी घेणे. तसेच केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या तर्फे रजिस्ट्रेशन करणे बंधन कारक आहे. |
| **रिसायकलर** | - | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून संमतीपत्र घेणे बंधनकारक असुन पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही, याची खबरदारी घेणे. तसेच केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्या तर्फे रजिस्ट्रेशन करणे बंधन कारक आहे. |

महाराष्ट्र  प्रदूषण नियत्रण मंडळ यांचे मार्फत ई कचरा उत्पादक, रीफर्बिशर व रिसायकलर यांना ई कचरा (व्यवस्थापन)  या नियम, २०१६ अंतर्गत संमती पत्र  प्रदान करण्यात येतात.

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने मे.आयआरजी सिस्टम साउथ एशिया प्रा. लि. नवी दिल्ली यांना महाराष्ट्रातील गोळा होणाऱ्या ई-कचरा सर्वेक्षण करण्याचे काम दिलेले आहे.

महाराष्ट्रात ई कचऱ्याचे नियोजनबद्ध व्यवस्थापन व विल्हेवाट लावण्यासाठी ई कचरा व्यवस्थापन अधिकृत केंद्राना (डिसमेंटलर व रिसायकलर) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांनी नोंदणीपत्र व संमतीपत्र देऊन मान्यता दिलेली आहे.  महाराष्ट्रात एकूण अशी  १६४ अधिकृत ई कचरा (डिसमेंटलर-१५१ व रिसायकलर-१३) केंद्रे उपलब्ध आहेत.  या १६४ अधिकृत ई कचरा (डिसमेंटलर व रिसायकलर) केंद्रांची क्षमता दरवर्षी  १४३८११.५ मे.टन एवढी आहे.  या संस्था विविध भागातून ई कचरा गोळा करुन ते संकलित करतात व सुरक्षितरित्या हाताळुन त्याची विल्हेवाट लावतात, तसेच सध्या अस्तित्वात असलेल्या सामुहिक घातक घनकचरा प्रक्रिया व विल्हेवाट केंद्र (तळोजा, नवी मुंबई व रांजणगांव पुणे)  या ठिकाणी मोठ्या क्षमतेचे ई-कचरा व्यवस्थापन डिसमेंटलर व रिसायकलर केंद्र उभारणे बाबतचे  प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत.  ई-कचरा नियमांच्या प्रभावी अंमलबजावणी करिता सक्रिय पावले उचलावीत याकरिता महाराष्ट्र राज्यातील सर्व महानगर पालिका आयुक्तांना निर्देश दिले आहेत.

## १५.    वातावरणीय बदल  -

जागतिक स्तरावर वातावरणीय बदलासंबंधी होत असलेल्या कार्यवाहीस अनुसरुन महाराष्ट्र राज्याने राज्य स्तरावर वातावरणीय बदलाच्या होणाऱ्या परिणामाच्या अनुषंगाने कृती आराखडा तयार करण्याचे निश्चित केले आहे. यासाठी महाराष्ट्र राज्याने The Energy and Research Institute (TERI) या संस्थेबरोबर सामंजस्य करार करून महाराष्ट्र राज्यातील वातावरणीय बदलाच्या अनुषंगाने होणारे परिणाम व त्यासाठी करावयाच्या उपाय योजनांबाबतचा सविस्तर कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. यात २०३०, २०५०, २०७० या कालावधीत संभाव्य वातावरणाच्या बदलांमुळे कृषि, जलस्त्रोत, तटीय क्षेत्र, जलसंपदेवर अवलंबून जीवनशैली या मुख्य स्त्रोतासह जैविक विविधता, आपत्ती व्यवस्थापन, वन व जैव विविधेतेवर होणारा संभाव्य परिणाम व त्यासाठी करावयाच्या उपाययोजनांचा समावेश आहे. उपरोक्तच्या अनुषंगाने महाराष्ट्र राज्यासाठी वातावरणीय बदल अनुकूलन धोरण तयार करण्यात आलेले असून सदर धोरणास दिनांक १०/१०/२०१७ रोजीच्या मा. मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता मिळाली असून दिनांक २५/१०/२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्याचे वातावरणीय बदल अनुकूलन धोरण निर्गमित केले आहे.

## १६.   पर्यावरण माहिती प्रणाली केंद्र (एन्व्हीस) -

एन्व्हीस हि १०० टक्के केंद्र शासन पुरस्कृत योजना असून या योजने अंतर्गत  पर्यावरण विषयक माहितीचा महाजाल विकसित करण्यात येत आहे. या योजनेत मुख्यत्वे पर्यावरणाशी निगडित विविध क्षेत्रातील शास्त्रीय माहितीचे संकलन करून ती विविध मार्गानी जनसामान्यांपर्यंत पोहचविणे असा असून, त्यामुळे धोरणात्मक निर्णय घेणारे इंजिनिअर्स, शास्त्रज्ञ  व सामान्य जनता इत्यादी पर्यंत अचूक माहिती योग्य वेळेत उपलब्ध होऊ शकेल.

राज्याचे एन्व्हीस केंद्र मार्च २००३ पासून कार्यान्वित असून या केंद्राने संपूर्ण पर्यावरण विषयक माहितीवर आधारित http://envis.maharashtra.gov.in हे संकेत स्थळ विकसित केले आहे.

या संकेत स्थळावर पर्यावरण विषयक सद्य:स्थिती अहवाल, पर्यावरण विषयक मूलभूत माहिती, कायदे, योजना, पर्यावरण विषयक बातम्यांचा साठा, ई-ग्रंथालय, स्लाईड शो, छायाचित्र दालन, चर्चा दालन, तक्रार निवारण प्रणाली, पर्यावरण शिक्षण. मुलांसाठी प्रश्नमंजुषा आणि विविध संदर्भित पुस्तके उपलब्ध करून देण्यात आले आहे. या केंद्राव्दारे ENVIS NEWSLETTER हे बातमीपत्र नियमितपणे प्रसिध्द करण्यात येते, जेणेकरुन पर्यावरण विषयक माहिती व त्याबाबत जागृती तळागाळापर्यंत पोहचते.

## १७. पर्यावरण विषयक जनजागृती उपक्रम -

### अ) "Call for Green Ideas" हरित संकल्पना -

पर्यावरण विषयक व्यापक जनजागृतीसाठी महाराष्ट्र राज्याच्या सुवर्ण जयंतीचे निमित्त साधून सन २०१० च्या जागतिक पर्यावरण दिनी पर्यावरण विभागा मार्फत "Call for Green Ideas"ही नाविन्यपूर्ण योजना राबविण्यास सुरुवात झाली. सदर योजनेचे स्वरूप हे शासनाच्या इतर चाकोरीबध्द योजनांसारखे नसून योजनेचा मूळ उद्देश राज्याच्या स्थानिक पर्यावरणाच्या गरजा लक्षात घेवून लोकसहभागातून नाविण्यपूर्ण कार्यक्रम राबविणे असा आहे. या योजनेद्वारे राज्यभरातून शहरी, ग्रामीण आदिवासी, पश्चिम घाट सागरतटीय या भागातील स्थानिक पर्यावरणीय समस्यांशी निगडीत कार्यक्रमांवर आधारित आणि लोकसहभाग असलेले प्रस्ताव, जनजागृती प्रकल्प व अंमल बजावणी प्रकल्प या दोन वर्गवारीत मागविण्यात येतात. प्रकल्पांची निवड ही प्रकल्पांचे नाविन्य, स्वयंसिध्दता, फलनिष्पती, योजनेचे कार्यक्षेत्र, इतरत्र वापर क्षमता, लोकसहभाग इ. निकषांनुसार करण्यात येते.

सन २०१० पासून दिनांक ३१/१२/२०२२ पर्यंत विभागास राज्यभरातून एकूण१३१४ प्रस्ताव प्राप्त झाले असून त्यापैकी ७६ नाविन्यपूर्ण प्रस्तावांची निवड करण्यात आली आहे. निवड प्राप्त प्रस्तावांमध्ये ४६ प्रस्ताव जनजागृती वर्गवारीतले असून ३० प्रस्ताव अंमल बजावणी वर्गवारीचे आहेत. उपरोक्त प्रस्तावास रु. ५५०.३९ लक्ष एवढा निधी मंजूर करण्यात आलेला आहे. योजनेंतर्गत निवड झालेल्या विविधांगी प्रकल्पांव्दारे समाजातील महत्त्वपूर्ण घटक जसे विविध संस्था, विद्यापीठ, महिला बचत गट, शासकीय विभाग, महाविद्यालये, पर्यावरण तज्ञ इ. पर्यावरणाच्या कामी शासनास मोलाचे सहकार्य करून इतरांसाठी प्रेरणा ठरत आहेत.

तसेच शासनाच्या जावक क्र. इएनव्ही-२०१६/प्र.क्र.७१/तांक.३, दिनांक ०८ नोव्हेंबर, २०१६ अन्वये हरित संकल्पना योजनेच्या अंमल बजावणीविषयी कार्यपध्दती सुधारितरित्या सुनिश्चित करण्यासाठी नव्याने मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

### ब) सृष्टी मित्र पुरस्कार -

महाराष्ट्र राज्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षाचे निमित्त साधून सन २०१० पासून "सृष्टीमित्र पारितोषिक" ही योजना पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करणे या व्यापक जनजागृतीसाठी सुरू करण्यात आलेली असून या अंतर्गत दरवर्षी राज्यस्तरीय पर्यावरण विषयक विविध स्पर्धेचे, पर्यावरण प्रकल्प, पर्यावरण छायाचित्र, बालसाहित्य, स्लाईड शो, घोषवाक्य, सर्वोत्तम इको-क्लब, पर्यावरण शिक्षणावर केस स्टडी व पर्यावरण संवर्धनात महिलांचे योगदान अशा वर्गवारीत आयोजन करण्यात येते. स्पर्धेअंतर्गत प्रत्येक श्रेणीतील सर्वात सृजनशील तसेच लक्षणीय अशा प्रवेशिकांना प्रशस्तीपत्र व रोख पारितोषिक देण्यात येते.

## १८.    पर्यावरणपूरक बांधकाम क्षेत्रातील मार्गदर्शक तत्वे -

विकासकामे व मूलभूत सोयीसुविधा पुरविण्याच्या अनुषंगाने बांधकाम प्रक्रियेमध्ये नैसर्गिक संसाधनांच्या अनिर्बंध वापरामुळे पर्यावरणाचे संतुलन बिघडत असल्याची बाब निदर्शनास आली.

राज्यात नैसर्गिक संसाधनाचा योग्य वापर, सुयोग्य कचरा व्यवस्थापन, हरितगृह वायू उत्सर्जनात संतुलन साधण्यासाठी तसेच जीवनमानात सुधार करण्याच्या अनुषंगाने शासन निर्णय क्र.इएनव्ही २०१३/प्र.क्र.१७७/तां.क.१ दिनांक १० जानेवारी, २०१४ अन्वये, पर्यावरण पूरक इमारत बांधकाम क्षेत्रासाठी मार्गदर्शक तत्वे तयार करण्यात आली आहेत.

पर्यावरण पूरक मार्गदर्शक तत्वांमध्ये खालील सहा घटकांचा समावेश करण्यात आला आहे.

१. बांधकाम स्थळ, परिस्थिती आणि वाहतूक.
२. पाण्याचे कार्यक्षम व्यवस्थापन, सांडपाणी प्रक्रिया आणि पुनर्वापर.
३. ऊर्जेचा कार्यक्षम वापर.
४. अपारंपारिक ऊर्जा वापर.
५. कचरा व्यवस्थापन.
६. इमारत बांधकाम साहित्य.

सदर मार्गदर्शक तत्वांच्या अंमल बजावणीमुळे ऊर्जा वापरात तसेच पाणी वापरात अनुक्रमे २०-३० टक्के व १५-२० टक्के बचत होणे अपेक्षित आहे. तसेच बांधकामाच्या वेळी २०-३० टक्के कमी कचरा उत्पादित होऊन त्यानुषंगिक प्रदूषणास आळा बसणार आहे.

## १९.   पर्यावरण सेवा योजना  -

राज्यातील विद्यार्थ्यांमध्ये लहानपणीच पर्यावरण संवर्धनाची बीजे बिंबवण्यासाठी व पर्यावरणपूर्वक संवेदनशील भावी पिढीच्या निर्मितीसाठी, पर्यावरण शिक्षण निसर्गाच्या सानिध्यात जाऊन प्रत्यक्ष कृतीच्या आधारे मुलांना समजावून सांगण्याच्या उद्देशाने माध्यमिक व उच्च  माध्यमिक शाळांमध्ये पर्यावरण सेवा योजना राबविण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला आहे. सन २०११-१२ या आथिर्क वर्षात सदर योजना पहिल्या टप्प्यामध्ये पुणे, सोलापूर, अमरावती, यवतमाळ, नागपूर, चंद्रपूर, नाशिक, जळगांव, रत्नागिरी व ठाणे या बारा जिल्ह्यामधील एकूण पन्नास इच्छुक माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमध्ये राबविण्यात येणार आहे. केंद्रीय पर्यावरण व वन मंत्रालयामार्फत सेंटर फॉर एनव्हायरमेंट एक्सलन्स (CEE) यांनी नियुक्त केलेले पर्यावरण शिक्षण केंद्र (CEE), पुणे हि संस्था राज्यस्तरीय संनियंत्रण संस्था म्हणून या योजनेसाठीची अंमलबजावणी करत आहे. निसर्ग व मानव यातील नातेसंबंध समजून घेऊन स्थानिक पर्यावरणाशी निगडित विविध समस्या प्रत्यक्ष सहभागाद्वारे समजावून घेऊन स्थानिक पातळीवर नैसर्गिक संसाधनांच्या व्यवस्थापनाबाबत स्थानिक लोकांच्या सहभागाने प्रत्यक्ष कृती कार्यक्रम राबविण्यासाठी हि योजना उपयुक्त ठरणार आहे.

## २०.    <u>माझी वसुंधरा अभियान -</u>

पर्यावरणाचे जतन, संवर्धन व संरक्षण करण्यासाठी माझी वसुंधरा (माय अर्थ) हा अभिनव उपक्रम विभागाने हाती घेतला आहे. जो निसर्गाच्या "पंचमहाभूते" नावाच्या पाचही घटकांवर लक्ष केंद्रित करतो. त्यात भूमी (जमीन), जल (पाणी), वायू (हवा), अग्नी (ऊर्जा), आकाश (संवर्धन) यांचा समावेश आहे.  या

उपक्रमातून वातावरणीय बदल आणि पर्यावरणाच्या समस्यांबद्दल नागरिकांना जागरूक करून त्यांना पर्यावरणाच्या सुधारणेप्रती प्रयत्न करता येतील. त्यातून राज्याच्या शाश्वत विकासाप्रति प्रयत्न केले जातील.

**<u>माझी वसुंधरा अभियानातून झालेले सकारात्मक बदल :</u>**

- या अभियानांतर्गत २१.९४ लाख झाडे लावण्यात आली. आरेतील जंगलाच्या ४ पट झाडे या उपक्रमाद्वारे राज्यभरात लावण्यात आली.
- १६५० हरित क्षेत्रांची निर्मिती शहरात व गावांमध्ये करण्यात आली. तसेच, २३७ जुनी हरित क्षेत्रे पुनर्जीवित करण्यात आली.
- माझी वसुंधरा अभियानांतर्गत शास्त्रीय पद्धतीने ओल्या कचऱ्याचे विलगीकरण, वर्गीकरण व त्यावर उपचार करण्यात आले. त्यामुळे, १०,६६३ टन कंपोस्ट खत दर महिन्याला तयार करण्यात आले. ज्याद्वारे ६३,९८२.५ टन कार्बन डायऑक्साईडचे सेक्वेस्टरेशन करण्यात आले.
- माझी वसुंधरा अभियानांतर्गत स्थानिक संस्थांना रेन वॉटर हार्वेस्टिंग आणि पर्कोलेशन या प्रक्रियांचा अवलंब करण्यास प्रोत्साहन दिले गेले. त्याचा परिणाम म्हणून, जवळपास ६ हजार जुन्या इमारती व ३.५ हजार नवीन इमारतींनी रेन वॉटर हार्वेस्टिंग सिस्टीमचा अवलंब केला, त्याचबरोबर सुमारे पंधराशे रेन वॉटर पर्कोलेशन स्थाने तयार करण्यात आली. या प्रयत्नांमुळे ११,१४५ दशलक्ष लिटर पाणी संवर्धन क्षमता तयार करण्यात आली आहे. जी, महाराष्ट्राला लागणाऱ्या १ दिवसाच्या पाण्याच्या मागणी इतकी आहे.
- सहभागी संस्थांनी राज्यातील ७७५ जल संस्था स्वच्छ करण्याचे काम पार पाडले.
- अभियाना दरम्यान १२.२३ लाख एलईडी बल्ब तसेच ७० हजार सोलर लाईट्स लावण्यात आले. ज्यामधून १.४ लाख युनिट वीज वाचवण्यास मदत झाली आहे.
- ग्रामीण भागात अभियानादरम्यान ७३६ बायोगॅस प्लांट व ७०१ सोलर पंप बसवण्यात आले. ज्यामुळे, जवळपास ३२.५ टन कार्बन डायऑक्साईडचे उत्सर्जन कमी झाले.
- माझी वसुंधरा अभियानामुळे पहिल्याच वर्षात ३,७०,९७८ टन कार्बन डायऑक्साईडचे उत्सर्जन कमी झाले. तुलना केल्यास हे प्रमाण १.७ कोटी मोठी झालेली झाडे जेवढा कार्बन डायऑक्साईड शोषून घेतील तितके आहे किंवा ३४ आरे जंगले जेवढा कार्बन डायऑक्साईड शोषून घेतील तेवढे आहे.
- माझी वसुंधरा २०२०-२१ अभियानाने महाराष्ट्रात शाश्वत विकास जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्यात मोलाची कामगिरी बजावली तसेच महाराष्ट्रात व देशभरात शाश्वत विकासाचा पाया रचला. पर्यावरणीय भान व बुद्धिमत्ता आत्मसात करून भविष्यातील सर्व उपक्रम राबवले जातील यासाठी माझी वसुंधरा अभियान प्रेरणादायी ठरले आहे.

**माझी वसुंधरा (माय अर्थ) अंतर्गत प्रथम वर्षात २०२०-२१ खालील उपक्रम राबविण्यात आले:-**

१. माझी वसुंधरा- अभियान

२ माझी वसुंधरा- हरित शपथ (# Epledge)

३ माझी वसुंधरा- अभ्यासक्रम

**माझी वसुंधरा- हरित शपथ: (# Epledge)**

माझी वसुंधरा हरित शपथ # Epledge अंतर्गत नागरिकांनी त्यांच्या दैनंदिन जीवनात अवलंबावयाच्या लहान, लहान पर्यावरण पूरक कृती / बदल नमूद केल्या आहेत. या लहान कृती / बदल संबंधितांकडून / समूहाकडून त्यांच्या दैनदिन जिवनात आचरणात आणल्यास त्याचा एकूणच सकारात्मक पर्यावरणीय बदल घडवून आणण्यास मदत होवू शकते.

माझी वसुधंरा हरित शपथ (#EPledge) या अभिनव उपक्रमाचा शुभारंभ मा. मुख्यमंत्री महोदयांच्या हस्ते मा. उप मुख्यमंत्री महोदयांचे उपस्थितित दिनांक ०१ जानेवारी २०२१ रोजी झाला. पर्यावरणाचे जतन, संरक्षण व संवर्धन करण्यासाठी राज्यातील नागरिकांनी पर्यावरण संवर्धनाची किमान एक तरी शपथ घ्यावी असे आवाहन करण्यात आले होते. त्यानुसार, दिनांक १ जानेवारी, २०२१ ते दिनांक १५ जून, २०२१ या कालावधीत माझी वसुंधरा मित्र परिवारात सुमारे १.५० कोटी सदस्य झाले आहेत.

**माझी वसुंधरा- अभ्यासक्रम:**

पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग व युनिसेफ यांच्यामध्ये झालेल्या सामंजस्य करारा अंतर्गत, पर्यावरण शिक्षणाच्या माध्यमातून मुलांमध्ये हरित मूल्ये रूजविण्यासाठी माझी वसुंधरा अभ्यासक्रम हा एकमेव अद्वितीय उपक्रम हाती घेण्यात आला होता.

विद्यार्थ्यांना चार भिंतींच्या आत कोंडण्यापेक्षा त्यांना पर्यावरण व वातावरणीय बदलासंदर्भातील शिक्षण वर्गाबाहेर व प्रात्यक्षिकाद्वारे देता यावे, मुलांना शालेय जीवनातच पर्यावरण व वातावरणीय बदलांबद्दल सजगता निर्माण व्हावी यासाठी युनिसेफ सोबत झालेल्या सामंजस्य करारा अंतर्गत ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्नमेंट (AIILSG) त्याअंतर्गत रिजनल सेंटर फॉर अर्बन अँड एन्व्हायर्नमेंटल स्टडीज (RCUES) तसेच, सेंटर फॉर एन्व्हायर्नमेंट एज्युकेशन (CEE), पुणे व शालेय आभ्यासक्रम तयार करणारे पर्यावरण तज्ञ (डोमेन तज्ञ) यांच्या सहाय्याने शालेय अभ्यासक्रमात सध्या असलेला पर्यावरण अभ्यासक्रमाचा अभ्यास करून इयत्ता १ ली ते इयत्ता ८ वी च्या शालेय विद्यार्थ्यांसाठी खालील विषयांवरील गुणवत्तापूर्ण पर्यावरण विषयक शालेय अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे.

- जैवविविधता संवर्धन.
- घनकचरा व्यवस्थापन आणि वैयक्तिक आणि समुदाय आरोग्य.
- जलस्त्रोत व्यवस्थापन.
- ऊर्जा, वायू प्रदूषण आणि वातावरण बदल.

पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाने युनिसेफ व या क्षेत्रातील तज्ञांच्या सहाय्याने तयार केलेला सदर शालेय आभ्यासक्रम सोमवार, दिनांक १३ डिसेंबर, २०२१ रोजी पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाचे मा. मंत्री, महोदयांनी शालेय शिक्षण विभागाच्या मा. मंत्री महोदयांकडे सूपूर्द केला आहे.

सदर अभ्यासक्रम राज्याच्या शालेय शिक्षण अभ्यासक्रमामध्ये अंतर्भूत करण्याबाबतची पुढील कार्यवाही शालेय शिक्षण विभागामार्फत सुरू आहे. पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी मागील एक वर्षात विभागामार्फत खालील प्रमाणे निर्णय घेवून त्याची अंमलबजावणी करण्यात येत आहे.

**महाराष्ट्र वातावरण बदल परिषद :**

वातावरणीय बदलाच्या परिणामांवर अनुकूलन (adaptation) व उपशमन (mitigation) करण्यासाठी मा. मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखाली व उपमुख्यमंत्री यांच्या सह.अध्यक्षतेखाली महाराष्ट्र वातावरणीय बदल परिषद (Maharashtra Council for Climate Change (MCCC) गठीत करण्यात आली आहे. यामध्ये संबंधित विभागाच्या मा. मंत्री महोदयांचा समावेश करण्यात आला आहे.

**अमृत शहरांचा रेस टु झिरो मध्ये समावेश:**

राज्यातील ४३ अमृत शहरांनी रेस टु झिरो मध्ये सहभाग घेतला आहे. वातावरणातील बदल मर्यादित ठेवण्यासाठी कार्बन-डाय-ऑक्साईड आणि इतर ग्रीनहाऊस गॅसेसच्या उत्सर्जनात घट होईल अशा उपाय योजना करून शहरे कार्बन न्युट्रल (कार्बन न्युट्रल = उत्सर्जन होणाऱ्या व शोषल्या जाणाऱ्या $CO_2$ चे प्रमाण सम ठेवणे) करणे आवश्यक आहे.

त्यादृष्टिने पहिले पाऊल म्हणून राज्य शासनाने राज्यातील ४३ अमृत शहरांतील कार्बन उत्सर्जनाचा अभ्यास करून ती शहरे पुढील कालावधीत कार्बन न्युट्रल करण्यासाठीचा रोडमॅप तयार करण्यासाठी स्वतंत्र यंत्रणेची नियुक्ती करण्यात येत आहे. सदर यंत्रणेमार्फत या सर्व ४३ शहरांमधील कार्बन उत्सर्जन कमी करण्यासाठीचा रोडमॅप तयार करण्यात येणार आहे.

**महाराष्ट्र इलेक्ट्रिक वाहन धोरण:**

इलेक्ट्रिक वाहनांबाबत सर्वात व्यापक आणि सर्वांगीण धोरण तयार केले आहे. या धोरणा अंतर्गत नवीन वाहन नोंदणीमध्ये इलेक्ट्रिक वाहनांचे १० टक्के उद्दिष्ट साध्य करणे, २०२५ पर्यंत लास्ट माईल डिलेव्हरी वाहने तसेच सार्वजनिक वाहतुकीचे २५ टक्के विदुयतिकरण करणे तसेच एम.एस.आर.टी.सी बस फिल्टपैकी १५ टक्के बसेसचे इलेक्ट्रिक वाहनामध्ये रूपांतर करणे इत्यादी बाबींचा यात समावेश आहे.

**वृक्ष अधिनियमात सुधारणा :**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम, १९७५ मध्ये नागरी भागातील झाडांच्या संवर्धनावर लक्ष केंद्रित करून सुधारणा करण्यात आली आहे. या दुरुस्त्यांमध्ये राज्य स्तरावर महाराष्ट्र राज्य वृक्ष प्राधिकरणाची निर्मिती, हेरिटेज वृक्षांची संकल्पना तसेच वृक्षांच्या वयाला विशेष महत्त्व देऊन वृक्षांच्या संवर्धनाच्या उपायांसाठी महत्त्वाचे मापदंड इत्यादी बाबींचा समावेश करण्यात आला आहे.

वातावरणीय बदलाच्या दिशेने महाराष्ट्राच्या प्रयत्नांची दखल घेत राज्यास स्कॉटलंडमध्ये झालेल्या COP-२६ दरम्यान अंडर२ कोएलिशन लीडरशिप अवॉर्ड्स २०२१ अंतर्गत "प्रेरणादायी प्रादेशिक नेतृत्व" पुरस्कार मिळाला. हा पुरस्कार विभागाचे मा. मंत्री, पर्यावरण व वातावरणीय बदल महोदयांनी स्वीकारला. हा पुरस्कार मिळवणारे महाराष्ट्र हे देशातील केवळ एकमेव राज्य आहे.

**माझी वसुंधरा अभियान २.० (२०२१-२२):**

माझी वसुंधरा अभियान २.० ची सुरवात मा. मुख्यमंत्री महोदयांच्या शुभ हस्ते पर्यावरण दिना दिवशी करण्यात आली असून, या अभियानांतर्गत स्थानिक संस्थांना काम करण्यासाठी दिनांक १६ एप्रिल, २०२१ ते दिनांक ३१ मार्च, २०२२ एवढा कालावधीत देण्यात आला आहे. दिनांक १ एप्रिल ते ३० एप्रिल, २०२२ या कालावधीत स्थानिक संस्थांनी केलेल्या कामाचे डेस्क्टॉप असेसमेंट करण्यात येणार आहे. तर, दिनांक १ मे, ते ३१ मे २०२२ या कालावधीत फिल्ड असेसमेंट करण्यात येईल. माझी वसुंधरा अभियान २.० अभियानाचा बक्षीस समारंभ दिनांक ५ जून, २०२२ रोजी म्हणजे पर्यावरण दिनी करण्याचे नियोजित आहे.

**<u>पर्यावरण व वातावरणीय बदल विभागातील अधिकारी त्यांचे पदनाम व दूरध्वनी क्रमांक</u>**

| | |
|---|---|
| श्री. प्रविण दराडे<br>प्रधान सचिव (पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग) | दू. क्र. ०२२-२२८७३८४५<br>दू. क्र. ०२२-२२८२५९७३ |
| श्री. सुर्यकांत कि. निकम<br>सह सचिव (आस्थापना) | दू. क्र. ०२२-२८५४७०७ |
| श्री. अ. म. पिंपरकर<br>संचालक (पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग) | दू. क्र. ०२२-२२०२९३८८ |
| श्री. संदीप शा. कांबळे<br>उप सचिव (तांत्रिक कक्ष-२) | दू. क्र. ०२२-२२८१९५१७ |
| श्री. चंद्रकांत विभुते<br>शास्त्रज्ञ श्रेणी.१ (तां.क.३) | दू. क्र. ०२२-२२८५५०८२ |
| श्री. द. सु. भालेराव<br>शास्त्रज्ञ श्रेणी.२ (तां.क.-२) | दू. क्र. ०२२-२२८१९५१७ |
| श्री. जॉय ठाकूर (अति. कार्य.)<br>शास्त्रज्ञ श्रेणी -१ ( तां. क. १) | दू. क्र. ०२२-२२८५२६९६ |
| श्रीमती अर्चना परशुरामे<br>शास्त्रज्ञ श्रेणी.२ ( तां. क. 1) | दू. क्र . ०२२-२२८७३८४४ |
| श्रीमती शाहीन जमादार<br>कक्ष अधिकारी (आस्थापना) | दू. क्र . ०२२-२२८७३१५५ |

| | |
|---|---|
| श्री. संजय संदानशिव (अति. कार्य.)<br>अवर सचिव (तां.क.-४ व अति. कार्य.) | दू. क्र. ०२२-२२८५५०८२ |
| श्री. किशोर सोईतकर<br>कक्ष अधिकारी (रोख शाखा) | दू. क्र. ०२२-२२७९३१३१ |
| कार्यालय दूरध्वनी क्र. व | दू. क्र. ०२२-२२०२९३८८ |
| विभागातील पर्यावरण विषयक<br>संकेतस्थळांची नावे | http://ec.maharashtra.gov.in<br>http://envis.maharashtra.gov.in<br>http://mczma.maharashtra.gov.in<br>http://mahaenvis.nic.in |

विभागाचे संकेतस्थळ
environmentdepartment@gmail.com
Email Address :

**पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या अमंलबजावणीकरिता पदनिर्देशित करण्यात आलेल्या सहायक जन माहिती अधिकारी, जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांची कार्यासन निहाय माहिती .**

| **आस्थापना (संपूर्ण प्रशासन शाखा)** | **आस्थापना-अ** | **तांत्रिक कक्ष-१** | **तांत्रिक कक्ष-२** | **तांत्रिक कक्ष- ३** | **तांत्रिक कक्ष-४** |
|---|---|---|---|---|---|
| श्री. सु. कि. निकम, सह सचिव तथा अपिलीय अधिकारी | श्री. सु. कि. निकम, सह सचिव तथा अपिलीय अधिकारी | श्री. जॉय ठाकूर, शास्त्रत्र श्रेणी-२ तथा अपिलीय अधिकारी | श्री.संदीप शा. कांबळे, उप सचिव तथा अपिलीय अधिकारी | श्री. चं. अ. विभुते, संचालक शास्त्रज्ञ श्रेणी-१ तथा अपिलीय अधिकारी | श्री. अ. म. पिंपरकर, संचालक तथा अपिलीय अधिकारी |
| श्रीमती शाहीन जमादार, कक्ष अधिकारी (आस्थापना) तथा जन माहिती अधिकारी | श्रीम. अर्चना परशुरामे, शास्त्रज्ञ श्रेणी-२ तथा जन माहिती अधिकारी | १) श्रीम. अर्चना परशुरामे, शास्त्रज्ञ श्रेणी-२ तथा जन माहिती अधिकारी | श्री. द. सु. भालेराव शास्त्रज्ञ श्रेणी-२ तथा जन माहिती अधिकारी | श्री. विशाल वि. मदने, (अति. कार्य.) अवर सचिव तथा जन माहिती अधिकारी | श्री. विशाल वि. मदने , अवर सचिव तथा जन माहिती अधिकारी |
| श्रीम. मुग्धा पुराडउपाध्ये, सहायक कक्ष अधिकारी तथा सहायक माहिती अधिकारी | श्री. कपिल निकम, सहायक कक्ष अधिकारी तथा सहायक माहिती अधिकारी | श्रीम. छाया र. हिरे, सहायक कक्ष अधिकारी तथा सहायक माहिती अधिकारी | श्री. ध. बा. काळबांडे सहायक कक्ष अधिकारी तथा सहायक माहिती अधिकारी | श्री. अक्षय ब. शिंदे, सहायक कक्ष अधिकारी तथा सहायक माहिती अधिकारी | श्री. प्रवीण अ. पंडीत, सहायक कक्ष अधिकारी तथा सहायक माहिती अधिकारी |

| **राज्यस्तरीय पर्यावरण तज्ञ समिती - १** | **राज्यस्तरीय पर्यावरण तज्ञ समिती - २** | **राज्यस्तरीय पर्यावरण तज्ञ समिती - ३** | **राज्यस्तरीय पर्यावरण आघात मुल्यांकन प्राधिकरण** |
|---|---|---|---|
| श्री. अ. म. पिंपरकर संचालक तथा अपिलीय अधिकारी | श्री. सु. कि. निकम सह सचिव तथा अपिलीय अधिकारी | श्री. जॉय ठाकूर शास्त्रत्र श्रेणी-२ तथा अपिलीय अधिकारी | श्री. अ. म. पिंपरकर संचालक तथा अपिलीय अधिकारी |
| श्री. जॉय ठाकूर शास्त्रज्ञ श्रेणी-२ तथा जन माहिती अधिकारी | श्री. चं. अ. विभुते शास्त्रज्ञ श्रेणी-१ तथा जन माहिती अधिकारी | श्रीम. अर्चना परशुरामे शास्त्रज्ञ श्रेणी-२ तथा जन माहिती अधिकारी | श्री. द. सु. भालेराव शास्त्रज्ञ श्रेणी-२ तथा जन माहिती अधिकारी |

## पर्यावरण  व वातावरणीय बदल विभागातील पदे  व वेतन श्रेणी

| अ.क्र. | पदनाम | पे बँड | वेतनश्रेणी (६ वा वेतन आयोग) | वेतन स्तर | सुधारित वेतनश्रेणी (७ वा वेतन आयोग) |
|---|---|---|---|---|---|
| **राजपत्रित** | | | | | |
| १ | प्रधान सचिव | | संवर्ग पद | | संवर्ग पद |
| २ | सह सचिव | पीबी-४ | ३७४००-६७००० ग्रेड पे ८७०० | एस-२७ | १२३१००-२१५९०० |
| ३ | उप सचिव | पीबी-३ | १५६००-३९१०० ग्रेड पे ७६०० | एस-२५ | ७८८००-२०९२०० |
| ४ | अवर सचिव | पीबी-३ | १५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० | एस-२३ | ६७७००-२०८७०० |
| ५ | अवर सचिव (विधी) | पीबी-३ | १५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० | एस-२३ | ६७७००-२०८७०० |
| ६ | कक्ष अधिकारी | पीबी-२ | ९३००-३४८०० ग्रेड पे ४८०० | एस-१७ | ४७६००-१५११०० |
| **अराजपत्रित** | | | | | |
| १ | उच्चश्रेणी लघुलेखक | पीबी-२ | ९३००-३४८०० ग्रेड पे ४४०० | एस-१५ | ४१८००-१३२३०० |
| २ | निम्नश्रेणी लघुलेखक | पीबी-२ | ९३००-३४८०० ग्रेड पे ४३०० | एस-१६ | ३८६००-१२२८०० |
| ३ | सहायक कक्ष अधिकारी | पीबी-२ | ९३००-३४८०० ग्रेड पे ४३०० | एस-१४ | ३८६००-१२२८०० |
| ४ | लिपिक-टंकलेखक | पीबी-१ | ५२००-२०२०० ग्रेड पे १९०० | एस-६ | १९९००-६३२०० |
| ५ | वाहनचालक | पीबी-१ | ५२००-२०२०० ग्रेड पे १९०० | एस-६ | १९९००-६३२०० |
| **वर्ग-ड** | | | | | |
| १ | रोनिओ चालक | १-एस | ४४४०-७४४० ग्रेड पे १६०० | एस-३ | १६६००-५२४०० |
| २ | झेरॉक्स चालक | १-एस | ४४४०-७४४० ग्रेड पे १६०० | एस-३ | १६६००-५२४०० |
| ३ | शिपाई | १-एस | ४४४०-७४४० ग्रेड पे १३०० | एस-१ | १५०००-४७६०० |
| **तांत्रिक कक्ष** | | | | | |
| १ | संचालक | पीबी-४ | ३७४००-६७००० ग्रेड पे ८७०० | एस-२७ | १२३१००-२१५९०० |
| २ | शास्त्रज्ञ -१ | पीबी-३ | १५६००-३९१०० ग्रेड पे ७६०० | एस-२५ | ७८८००-२०९२०० |
| ३ | शास्त्रज्ञ-२ | पीबी-३ | १५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० | एस-२३ | ६७७००-२०८७०० |

## पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या अधिपत्याखालील
## महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ
## Maharashtra Pollution Control Board

**प्रस्तावना:**

### १. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ : -

महाराष्ट्र जल प्रदूषण अधिनियम, १९६९ अन्वये महाराष्ट्र जल प्रदूषण नियंत्रण मंडळाची स्थापना १९७० साली झाली. या अधिनियमाऐवजी महाराष्ट्रात ०१ जून १९८१ पासून केंद्रीय जल प्रदूषण (प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९७४ स्वीकारला गेला. त्यामुळे या मंडळास अधिक अधिकार प्राप्त झाले. १९७४ चा अधिनियम स्वीकारल्यानंतर या मंडळाचे जल प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण मंडळ हे नाव बदलून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ असे ठेवण्यात आले. त्यानंतर १६ मे, १९८१ पासून हवा (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण) अधिनियम, १९८१ लागू करण्यात आला.

मंडळाची कार्ये:

१. विविध जलस्रोतांच्या व हवेच्या प्रदूषण नियंत्रणाखाली राज्यव्यापी योजना तयार करून त्याची अंमल बजावणी करणे.

२. जल प्रदूषण व हवा प्रदूषण प्रतिबंध नियंत्रणाबाबत राज्य शासनास सल्ला देणे.

३. जल प्रदूषण व हवा प्रदूषणासंबंधी, तसेच नियंत्रण कार्यवाही बद्दल माहिती संकलित करून प्रकाशित करणे.

४. जल प्रदूषण व हवा प्रदूषणासंबंधी समस्यांवरील संशोधनास प्रोत्साहन देणे, संशोधन करणे व त्यामध्ये सहभाग घेणे.

५. प्रदूषण नियंत्रणाखाली प्रशिक्षणाचे आयोजन करणे व संबंधित लोकशिक्षणाचे कार्यक्रम आयोजित करणे.

६. नागरी सांडपाणी, औद्योगिक सांडपाणी, त्याचप्रमाणे सांडपाणी प्रक्रिया संयंत्राच्या कार्याचे अधिनियमातील तरतुदीनुसार संमतीपत्र संदर्भात परिक्षण करणे, हवा प्रदूषण नियंत्रणाखाली असलेले उपकरण, यंत्रणा औद्योगिक सयंत्रणा, उत्पादन यांचे परिक्षण करणे व आवश्यक प्रदूषण नियंत्रण उपाय योजनेसाठी निर्देशित करणे.

७. हवा प्रदूषण नियंत्रण क्षेत्रातील हवेचे मूल्यमापन करणे व प्रदूषण प्रतिबंधात्मक उपाय योजना करणे.

८. सांडपाण्यातील व हवेतील प्रदूषण घटकांची मानके निश्‍चित करणे व त्यामध्ये सुधारणा करणे, त्याचप्रमाणे प्रदूषण घटक मिसळणाऱ्या जलस्रोतांची वर्गवारी करून त्याची मानके निश्‍चित करणे. विविध औद्योगिक संयंत्रातील उत्सर्जनानुसार हवा प्रदूषण घटकांची मानके इच्छित करणे.

९. एका विशिष्ट प्रकारच्या उद्योगामुळे/प्रकल्पामुळे ठराविक ठिकाणची हवा प्रदूषित होणार असेल किंवा जल प्रदूषित होणार असेल तर त्याबाबत राज्य शासनास योग्य तो सल्ला देणे.

१०. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ व राज्य शासनाने वेळोवेळी नेमून दिलेली कार्ये पार पाडणे.

## उपाययोजना
## पर्यावरण संरक्षण व प्रदूषण नियंत्रण

१. जल प्रदूषणाचे गांभीर्य आणि व्याप्ती लक्षात घेऊन नद्यांच्या खोऱ्याचे प्रदेश जल प्रदूषण प्रतिबंध क्षेत्र म्हणून अधिसूचित करण्यात आले. या क्षेत्रातील सांडपाण्याचे नि:स्सारण करण्यासाठी प्रदूषक अभिकरणास मंडळाचे संमतीपत्र घ्यावे लागते. संमतीपत्राबाबतची प्रक्रिया व अटींची माहिती परिशिष्ट एक (अ),(ब),(क) व (ड) मध्ये जोडली आहे.

२. कारखाना उभारणीसाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने संमतीपत्र दिल्यानंतर पर्यावरण विभागाने पर्यावरण अनुमती देण्याबाबतचा कालावधी परिशिष्ट दोन मध्ये दर्शविण्यात आला आहे.

३. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने जल कायद्याअंतर्गत संमतीपत्र नामंजूर केल्यास अपील / पुनर्निरीक्षण अपील करण्याबाबत व त्यावरील निर्णय देण्याबाबत लागणारा कालावधी परिशिष्ट तीन मध्ये नमूद केला आहे.

४. प्रदूषण विषयक तक्रारी :- प्रदूषणाबाबत तक्रारी प्राप्त झाल्यावर विहित कालावधीत करावयाची कार्यपद्धती परिशिष्ट चार मध्ये नमूद केलेली आहे.

५. सांडपाण्यातील विविध प्रदूषण घटकांमुळे प्रदूषणाची निर्मिती होते. सर्व उद्योगांना, ज्याचे उत्पादन प्रक्रियेतून निर्माण होणाऱ्या प्रदूषणास आळा घालण्यासाठी योग्य ती यंत्रणा उभारणे व ती चालविणे बंधनकारक आहे. लघुउद्योग स्वत:ची सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा बसविणे आर्थिकदृष्ट्या सोईस्कर नसते म्हणून सामूहिक सांडपाणी प्रक्रिया योजना सुरू करण्यात आली आहे.

६. नद्यांचे प्रदूषण शहरी सांडपाण्यामुळे होत असल्यामुळे नद्यांचे काठावरील शहरांच्या सांडपाण्याची शुद्धिकरणानंतर योग्य प्रकारे प्रक्रिया करून विल्हेवाट लावली जाते. त्याप्रमाणे नदी घाट विकास, स्मशानभूमि, स्वच्छता गृहाचे बांधकाम व नदी काठी वनीकरण, सुशोभिकरण काम करणे इत्यादी कामे महानगरपालिका, नगर परिषदा अशा स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत करणे बंधनकारक आहे.

७. सरोवरांचे संरक्षण व संवर्धन या योजनेखाली सरोवराचे प्रदूषण रोखणे, पाणलोट क्षेत्रात प्रक्रियेची कामे हाती घेणे, सरोवरातील गाळ काढणे व सरोवरातील वन्यजीव यांचे संरक्षण व विकास कामे हाती घेतली जातात.

८. हवा प्रदूषण नियंत्रण - एखादा प्रदेश हवा प्रदूषण नियंत्रण क्षेत्र म्हणून घोषित झाल्यानंतर त्या प्रदेशातील उद्योगांना आपला कारखाना सुरु करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून हवा प्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी अनुमती मिळवावी लागते. अनुमती देण्यापूर्वी अशा उद्योजकांकडून हवा प्रदूषणाची चाचणी करणे, त्यातील प्रक्रिया यंत्रणेत वापरण्यात येणारा कच्चा माल, हवा प्रदूषण नियंत्रण यंत्रणेची आवश्यकता, हवा प्रदूषण नियंत्रणाची उत्तम पद्धत याचा अभ्यास करून व उत्सर्जित वायूचे नमुने तपासून अटींची पूर्तता झाल्यानंतर संमती पत्र देण्यात येते.

९. धुरांड्यातू होणाऱ्या उस्तर्जनाची तसेच वाहनातून होणाऱ्या उत्सर्जनाची रासायनिक तपासणी करण्यासाठी आवश्यक उपकरणांसहित प्रयोगशाळा कार्यरत आहेत.

१०. घातक कचरा व्यवस्थापन :- रसायने व जंतुनाशक बनविणाऱ्या कारखान्यातून निघणाऱ्या विषारी घटकांचे प्रमाण अधिक असते. हे प्रदुषणकारक घटक पाण्यामध्ये लवकर विरघळू शकतात. अशा प्रकारचे प्रदूषण पाणी पाझरून, विहिरींचे किंवा नदीचे पाणी प्रदूषित होण्याची शक्यता असते. म्हणून घातकचऱ्याच्या विल्हेवाटीसाठी काळजीपूर्वक जागा निवडण्यात येते. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास या कामासाठी नियुक्त केले आहे. टाकाऊ रासायनिक पदार्थ जाळून टाकण्यासाठी काही कारखान्याची स्वत:ची भस्मीकरण संयंत्रे उभारली आहेत. उद्योजकांना परवान्याचे नूतनीकरण करण्यापूर्वी घातक पदार्थांच्या समाधानकारक प्रक्रिया व विल्हेवाटीची पूर्तता करणे आवश्यक आहे.

११. रुग्णालय, पॅथॉलॉजिकल लॅब रासायनिक प्रयोगशाळा इत्यादि मधून निघणारा जैव वैद्यकीय कचरा प्रदूषित असतो. त्यामुळे जैव वैद्यकीय कचऱ्यावर शात्रोक्तरित्या प्रक्रिया त्याची विल्हेवाट लावण्यात येणे आवश्यक आहे. हि जबाबदारी संबंधित रुग्णालये, कत्तलखाने व प्रयोगशाळा या संस्थांची आहे. घातक द्रव गळतीच्या वेळी कोणती काळजी घ्यावी याबाबतची माहिती परिशिष्ट पाच मध्ये दिलेली आहे.

## परिशिष्ट-एक (अ)

## उद्योग उभारणीसाठी/ सुरु करण्यासाठी/ नुतनीकरणासाठी उद्योजकांना प्रदुषणाच्या विल्हेवाटी संबंधात संमतीपत्र देण्याबाबतचा कालावधी

| अ. क्र. | तपशिल | काम पूर्ण होण्याचा कालावधी | संपर्क अधिकारी व त्यांचे कार्यालय | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | जल, हवा, घातक घनकचरा विल्हेवाटीबाबत संमतीपत्रासाठी अर्ज स्विकारणे. | संगणकीय प्रणाली मार्फत (ऑनलाईन) अर्ज स्विकारले जातात. | उप प्रादेशिक कार्यालय | |
| २ | अर्जामधील त्रुटींबाबत अर्जदारास कळविणे | ७ दिवस | उप प्रादेशिक कार्यालय | |
| ३ | त्रुटींची पुर्तता केल्यानंतर जागेची व इतर बाबींची प्रत्यक्ष पडताळणी करण्यासाठी लागणारा कालावधी | ७ दिवस | उप प्रादेशिक कार्यालयातील संबंधित क्षेत्र अधिकारी | |
| ४ | पडताळणी केल्यापासून संमतीपत्र देण्यासाठी लागणारा कालावधी (भांडवल/ गुंतवणूकींवर आधारित) | | | |
| | अ. पांढरा संवर्ग | संमतीपत्राची आवश्यकता नाही. | उप प्रादेशिक कार्यालय | संगणकीय प्रणाली मार्फत (ऑनलाईन) म.प्र.नि.मंडळाच्या दप्तरी नोंद होण्यासाठी अर्ज भरणे आवश्यक |
| | ब. हिरवा संवर्ग संमतीपत्र - गुंतवणूक रु. १०० कोटीपर्यंत | ३० दिवस | उप प्रादेशिक अधिकारी | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | रु. १०० कोटी ते ५०० कोटी<br>रु. ५०० कोटी ते १००० कोटी<br>रु. १००० कोटी ते ४००० कोटी<br>रु. ४०००कोटी पेक्षा जास्त | ४५ दिवस<br>४५ दिवस<br>१२० दिवस<br>१२० दिवस | प्रादेशिक अधिकारी<br>विषय विभाग प्रमुख, म.प्र.नि.मंडळ, मुंबई<br>संमतीपत्र समिती, म.प्र.नि.मंडळ, मुंबई<br>संमतीपत्र मुल्यांकन समिती, म.प्र.नि.मंडळ, मुंबई | कायद्यामध्ये १२० दिवसांची तरतूद |
| | क. नारंगी संवर्ग संमतीपत्र - गुंतवणूक<br>रु. १५० कोटीपर्यंत<br>रु. १५० कोटी ते ५०० कोटी<br>रु. ५०० कोटी ते १५०० कोटी<br>रु. १५०० कोटी पेक्षा जास्त | <br>४५ दिवस<br>४५ दिवस<br>१२० दिवस<br>१२० दिवस | <br>प्रादेशिक अधिकारी<br>विषय विभाग प्रमुख, म.प्र.नि.मंडळ, मुंबई<br>संमतीपत्र समिती, म.प्र.नि.मंडळ, मुंबई<br>संमतीपत्र मुल्यांकन समिती, म.प्र.नि.मंडळ, मुंबई | <br>कायद्यामध्ये 120 दिवसांची तरतूद |
| | ड. लाल संवर्ग संमतीपत्र - गुंतवणूक<br>रु. १० कोटीपर्यंत *<br>रु. १० कोटी ते ५० कोटी<br>रु. ५० कोटी ते १५० कोटी<br>रु. १५० कोटी पेक्षा जास्त | <br>४५ दिवस<br>४५ दिवस<br>१२० दिवस<br>१२० दिवस | <br>प्रादेशिक अधिकारी<br>विषय विभाग प्रमुख, म.प्र.नि.मंडळ, मुंबई<br>संमतीपत्र समिती, म.प्र.नि.मंडळ, मुंबई<br>संमतीपत्र मुल्यांकन समिती, म.प्र.नि.मंडळ, मुंबई | कायद्यामध्ये १२० दिवसांची तरतूद<br>* प्रादेशिक अधिकारी यांच्या अधिकारात येत नसलेले उद्योग |

अर्ज संबंधित कार्यालयास प्राप्त झाल्यापासून
टिप्पणी :- वरील कालावधी हा परिपूर्ण व त्रुटीरहीत प्राप्त झालेल्या अर्जांसाठी बांधील राहील.

टिप : १. विहित कालावधीत काम पूर्ण न झल्यास संबंधितांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार करावी.
२.संमतीपत्राकरीता द्यावयाच्या शुल्काचा तक्ता परिशिष्ट १ (ब) प्रमाणे. शुल्क ऑनलाईन स्वीकारले जातील.

प्रदुषणाच्या विल्हेवाटीसंबंधात संमतीपत्रासाठी विहित केलेल्या अर्जासोबत द्यावयाची कागदपत्रे

अ. अनिवार्य कागदपत्रे
उद्योगाची भांडवली गुंतवणूक प्रमाणपत्र
उद्योग विभागाकडून मिळालेले ना हरकत प्रमाणपत्र
जागेची कागदपत्रे
उत्पादन प्रक्रियेची माहिती

प्रदूषण नियंत्रण यंत्रणासंबंधीची माहिती

ब. अतिरिक्त कागदपत्रे

स्थानिक स्वराज्य संस्थेचे ना हरकत प्रमाणपत्र

जल/ हवा गुणवत्ता अहवाल

इतर विभागाच्या अनिवार्य अनुमती

**Infra projects to be included Beded Hospitals to be included**
**(पायाभूत प्रकल्पांमध्ये खाटांच्या रुग्णालयांचा समावेश करण्यात येणार आहे)**
**स्थानिक स्वराज्य संस्थांना प्रदूषणाची विल्हेवाटीसंबंधात संमतीपत्र देण्याबाबत कालावधी**

| अ.क्र. | तपशिल | काम पूर्ण होण्याचा कालावधी | संपर्क अधिकारी व त्यांचे कार्यालय | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | " क " वर्ग नगरपालिका / परिषद | दिड महिना (संबंधित कार्यालयात अर्ज प्राप्त झाल्यापासून) | उप प्रादेशिक अधिकारी | |
| २. | " ब " वर्ग नगरपालिका व कंटोंनमेंट बोर्ड | दिड महिना (संबंधित कार्यालयात अर्ज प्राप्त झाल्यापासून) | प्रादेशिक अधिकारी | |
| ३. | " अ " वर्ग नगरपालिका कंटोंनमेंट बोर्ड | बैठकीत अर्ज प्राप्त झाल्यापासून १ महिन्याचा कालावधी | विभागप्रमुख, मुख्यालय | |
| ४. | महानगरपालिका | संमतीपत्र समितीचा अहवाल प्राप्त झाल्यापासून १ महिना | संमतीपत्र समिती | |

**टिपण्णी.** - वरील कालावधी हा परिपूर्ण व त्रुटीरहित प्राप्त झालेल्या अर्जासाठी बांधील राहील.

**प्रदूषणाच्या विल्हेवाटीसंबंधात संमतीपत्रासाठी विहित केलेल्या अर्जासोबत द्यावयाची कागदपत्रे**

१. संमतीपत्राची फी
२. जागेचा नकाशा
३. उत्पादन प्रक्रियेची माहिती
४. कारखान्याची प्रदूषण नियंत्रण यंत्रणेसंबंधी माहिती
५. उद्योग खात्याकडून मिळालेले ना हरकत प्रमाणपत्र
६. कारखान्याची भांडवली गुंतवणूक व प्रदूषण नियंत्रण यंत्रणेवर झालेली गुंतवणुकीची माहिती

**टिप.** १. विहित कालावधीत काम पूर्ण झाल्यास संबंधीतांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तक्रार द्यावी .
२. सदरील तक्त्यातील माहिती अर्जदारास माहिती व्हावी म्हणून महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई मुख्यालय, प्रादेशिक व उपप्रादेशिक अधिकारी यांचे कार्यालयात दर्शनी भागात ठळक अक्षरात लावून ठेवावी.

## परिशिष्ट एक (ब)
## उद्योग उभारणीसाठी व उद्योग सुरु करण्यासाठी संमतीपत्राकरिता द्यावयाच्या शुल्काचा तक्ता (२५.०८.२०११ पासून)

| उद्योगाची गुंतवणूक | उद्योग उभारणीसाठी | उद्योग सुरु करण्यासाठी |
|---|---|---|
| रु. 100 कोटीपेक्षा जास्त | रुपये<br>भांडवली गुंतवणुकीच्या<br>०.०२% | रुपये<br>भांडवलीच्या गुंतवणुकीच्या<br>०.०२% |
| रु. ७५ कोटीपेक्षा जास्त ते रु. १०० कोटी पर्यंत | १,२५,००० | १,२५,००० |
| रु. ५० कोटीपेक्षा जास्त ते रु. ७५ कोटीपर्यंत. | १,००,००० | १,००,००० |
| रु. २५ कोटीपेक्षा जास्त ते रु. ५० कोटी पर्यंत. | ७५,००० | ७५,००० |
| रु. १० कोटीपेक्षा जास्त ते रु. २५ कोटी पर्यंत | ५०,००० | ५०,००० |
| रु. ५ कोटीपेक्षा जास्त ते रु. १० कोटी पर्यंत | २५,००० | २५,००० |
| रु. १ कोटीपेक्षा जास्त ते रु. ५ कोटी पर्यंत | १५,००० | १५,००० |
| रु. ६० लाखापेक्षा जास्त ते रु. १ कोटी पर्यंत | ५,००० | ५,००० |
| रु. १० लाखापेक्षा जास्त ते रु. ६० लाखापर्यंत | १,५०० | १,५०० |
| रु. १० लाखापेक्षा कमी | ५०० | ५०० |

**टिप :-** वर उल्लेखिलेले उद्योग सुरु करण्यासाठी लाल, नारंगी व हिरवा संवर्गासाठी उद्योगांसाठी शुल्क अनुक्रमे १, २, व ३ वर्षासाठी आकारण्यात येते. संमतीपत्र शुल्क पाच पटीत दिल्यानंतर संमतीपत्राचा कालावधी अनुक्रमे ५, १० व १५ वर्षासाठी राहील.

खाण प्रकल्पासाठी केलेल्या भांडवली गुंतवणुकीवर आकारण्यात येणाऱ्या संमतीशुल्काव्यतिरिक प्रतिवर्षी प्रति टन रु. ०.४० एवढे संमती शुल्क द्यावे लागेल.

**स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी जल (प्रदूषण प्रतिबंध व नियंत्रण ) कायदा १९७४ अन्वये दोन वर्षासाठी संमतीपत्राचा कालावधी राहील व संमतीपत्राचे शुल्क खालीलप्रमाणे राहील:-**

| | |
|---|---|
| महानगरपालिका | रु. १,००,००० |
| अ - वर्ग नगरपालिका | रु. ५०,००० |
| ब - वर्ग नगरपालिका | रु. ५,००० |
| क - वर्ग नगरपालिका | रु. २,००० |

**टिप :-** संमतीपत्र शुल्क हे इपेमेन्ट गेटवेमार्फत ऑनलाईन अर्जासोबत स्वीकारले जाईल.

## परिशिष्ट एक (क)
## अधिकाराचे प्रदान

**संमतीपत्र जलद निकाली काढण्यासाठी, मंडळातील अधिकाऱ्यांना सदस्य सचिवांना व संमतीपत्र सत्यापन समितीस प्रदान करण्यास आलेले अधिकार पुढील प्रमाणे आहेत (गुंतवणुकीवर आधारित)**

| अ. क्र | प्राधिकरी/ समिती | लाल संवर्गातील उद्योग | नारंगी संवर्गातील उद्योग | हिरव्या संवर्गातील उद्योग | स्थानिक प्राधिकरण/ कटक मंडळे व इतर योजना प्राधिकरण | नगर वसाहत, माहिती तंत्रज्ञान विशेष आर्थिक विभाग, महामार्ग, जलसिंचन प्रकल्प इमारती व बांधकाम प्रकल्प |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | उप प्रादेशिक अधिकारी | -- | -- | रु. १०० कोटी पर्यंत | क वर्ग नगरपालिका व नगरपंचायत | -- |
| २ | प्रादेशिक अधिकारी | परिशिष्ट अ मधील उद्योग वगळून रु.१० कोटी पर्यंत | रु. १५० कोटी पर्यंत | रु. १०० ते रु. ५०० कोटीपर्यंत | ब वर्ग नगरपालिका व कटकमंडळे | रु. २५ कोटी पर्यंत |
| ३ | विभाग प्रमुख (तांत्रिक) | रु. १० कोटीहून अधिक ते रु.५० कोटी पर्यंत | रु. १५० कोटीहून अधिक ते रु. ५०० कोटीपर्यंत | रु. ५०० कोटी ते रु. १००० कोटीपर्यंत | अ वर्ग नगरपालिका व कटकमंडळे | रु. २५ कोटी ते रु. १०० कोटीपर्यंत |
| ४ | संमतीपत्र समिती (सदस्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली) | रु. ५० कोटीहून अधिक ते रु. १५० कोटीपर्यंत | रु. ५०० कोटीहून अधिक ते रु. १५०० कोटीपर्यंत | रु. १००० कोटीहून अधिका ते रु. ४००० कोटीपर्यंत | सर्व महानगरपालिका | रु. २५कोटीहून` अधिक ते रु. ७५० कोटीपर्यंत |
| ५ | संमतीपत्र मूल्यांकन समिती | रु. १५० कोटीहून अधिक | रु. १५०० कोटीहून अधिक | रु. ४००० कोटीहून अधिक | ---- | रु. ७५० कोटीहून अधिक |

**परिशिष्ट दोन**

**कारखाना उभारणीसाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने संमतीपत्र दिल्यानंतर पर्यावरण विभागाने पर्यावरण अनुमती देण्याबाबत कालावधी**

| अ. क्र | तपशील | संपर्क अधिकारी व काम पूर्ण होण्याचा कालावधी | त्यांचे कार्यालय | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | जल, हवा व घनकचरा विल्हेवाटीबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने संमतीपत्र दिल्यानंतर विनिर्दिष्ट केलेल्या कारखान्यांनी केंद्र शासन अथवा राज्य शासनाकडे पर्यावरण अनुमती घेण्याबाबत विहित नमुन्यात २० प्रतींसह अर्ज सादर करावा. | कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी ११ ते १ व दुपारी २ ते ४ वाजेपर्यंत. | उपसचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई. | - |
| २ | अर्ज प्राप्तीनंतर तांत्रिक छाननीसाठी लागणारा कालावधी . | १ महिना | संचालक, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई. | - |
| ३ | राज्य मुल्यांकन समितीपुढे शिफारसीसाठी लागणारा कालावधी | २ महिने | पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई. | - |
| ४ | शासनाने पर्यावरण अनुमतीसाठी निर्णय घेण्यास लागणारा कालावधी | १ महिना | सचिव, पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, मंत्रालय, मुंबई.. | - |

**टिप :- अर्जासोबत द्यावयाची कागदपत्रे.**

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने कारखाना उभारणीसाठी दिलेले संमतीपत्र.

(ब) पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल.

(क) पर्यावरण व्यवस्थापन आराखडा.

(ड) संभाव्य धोका मुल्यांकन अहवाल.

(इ) घटना स्थळ व्यवस्थापन आराखडा

## परिशिष्ट तीन

## महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने जल कायद्यांतर्गत संमतीपत्र नामंजूर केल्यास अपील व पुर्निरीक्षण अपील करण्याची तरतूद

| अ. क्र | तपशील | काम पूर्ण होण्याचा कालावधी | संपर्क अधिकारी व त्याचे कार्यालय | शेरा |
|---|---|---|---|---|
